वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची आगाऊ रु० ५ डाक हांशील ०।३
सहामाही ॥ ३ ॥ ०।८
सालअखेर ॥ ७ ॥ १।८
किरकोळ अंकास............०।४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१॥
दुसरे खेपेस .......

Rs.
erannum in advance 5 Postage 13
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..........................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 4 MAY 1891 NO 17

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख ४ माहे मे सन १८९१ इ० अंक १७



## HEALTH WEALTH &PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या व पुतळ्या.

खात्रीचा माल घेऊन  खोटा माल घेऊन

अनुभव पहा. फसूं नका.

### ५०००० वर विकल्या.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युत्‌ता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगावर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे व त्यापासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचार शिवाय बरीं झालीं आहेत. याविषयीं हवा तो डॉक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग या लहानशा वस्तूपासून बरे होतात. संधिवायु, शिरांत वायु, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, मोडक, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्रशयांतील रोग, मस्तक शूळ, मुळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांजवळ असावी हें योग्य आहे. ही वस्तू एकदां घेतली म्हणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर निकेल आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु.३ व पुतळीस रु. २, सोन्याचे आंगठीस रु० २० व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक नग जास्त मिळेल. एक पासून सहा नग पर्यंत ट० हा० सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्हा० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती पत्रका करितां अर्धा आणा पाठवावा.

विकत मिळण्याचा पत्ता:—जी. बी. नाईक आणि कंपनी, भायखळा—मुंबई, बुधवारपेठ—पुणें

लोहभस्म केशर मिश्र व **बलभीम पाक.** पुष्कळ वनस्पती मिश्रित

एकदम १०० तोळे पाक घेणारांस १। रु. ची विजेची पुतळी फुकट मिळेल.

शिफारसपत्र—आपल्याकडून मागविलेला बलभीम पाक मी माझ्या मुलास दिला. त्याची पांडुरोगासारखी भावना होऊन दिवसेंदिवस शरीर प्रकृति तेजहीन आणि अशक्त होत चाल्ली होती, ती आपल्या पाक सेवनानें बरीच सुधारली. पुनः ८० तोळे पाक जरूर पाठवावा. रघुनाथ अनंत जमादार गदग रे० स्टेशन.

हा पाक लोकांच्या अनुभवास आलेला व थोर लोकांनीं पसंत केलेला व खाण्याला गोड असून ( ५।६ जिल्ह्यांतील लोकांस गुण आला आहे. ) याच्या सेवनानें पुढें लिहिलेले गुण मनुष्याला प्राप्त होतात. नपुंसकत्वा सारखी नेबळाई नाहींशी होते. आंगावर चांगली कांती येते. शरीर पुष्ट होतें. धातु वाढते. स्वप्नावस्था व लघवींतून धातु जाण्याची बंद होते. योग्य वेळीं धातु लवकर पतन होत नाहीं. कामेच्छा वाढते. शक्ति येते. भूक चांगली लागते. शौचाला साफ होतें. डोळ्यांस थंडावा येऊन दृष्टि तीव्र होते. परम्याचा जुनाट रोग जातो. पित्त, आम्लपित्त, दमा, हगवण, आंव हे विकार जातात. स्त्रिया, पुरुष व मुलें यांनीं हा पाक घेण्यास फारच नामी आहे. कितीही तोळ्यांचे ३ डबे घेणारांस त्या मासल्याचा एकडबा बक्षीस देऊं. दर २० तोळ्यांच्या ड. २॥ रु०, ४० तो० ड० ४॥। रु०, ८० तो० ड० ८ रु०, १०० तोळ्यांच्या डब्यास १९॥ रु०, टपाल व बंगखर्च निराळा पडेल

शिफारसपत्र—आह्मी तिघा मित्रांनीं मिळुन आपला बलभीम पाक २७० तोळे घेतला आणि त्यापासून यावा तसा गुणही आला आह्मी चांगल्या मार्गी पैशाचा व्यय केला त्याबद्दल आनंद होत आहे. पाक गुणकारी आहे यांत शंका नाहीं. हणमंत कल्याणराव, हणमंत कृष्ण बि० व राघवेंद्र व्यंकटेश बिडीकार०

पत्ता— लक्ष्मण आप्पाजी परांजपे-धारवाडवृत्त ऑफीस. मु० धारवाड.

### जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कावितकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

### सचित्रकॅटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.


## देवगिरी अथवा दौलताबाद.

अवरंगाबाद शहरांहून देवगिरी अथवा दौलताबाद या नावचा सुप्रसिद्ध किल्ला सुमारें पाच कोसावर आहे. अवरंगाबाद येथें गाडी किंवा तांगा भाड्यानें करून दौलताबाद, रोजेशरीफ, व वेरूळाची लेणी पाहण्यास जातां येतें आम्हीं तांग्यातून बसून दौलताबाद येथें प्रातःकाळीं येऊन पोहोंचलों. किल्ला पाहण्यास जावयाचें असलें म्हणजे अवरंगाबाद येथील तालुकदार यांच्या सहीचा पास घ्यावा लागतो. इंग्रजाच्या छावणींत कंटोनमेंट माजिस्ट्रेट या नावाचा जो अधिकारी आहे त्याला ही हा पास देण्याचा अधिकार आहे. किल्लेदाराजवळ हा पास दिला म्हणजे किल्लेदार आपल्या बरोबर एक वाटाड्या देतो. तो वाटाड्या आपणास किल्यांत घेऊन जातो. किल्या भोंवती जो पहिला तट आहे त्याचा परीघ सुमारें दिड कोसाचा आहे. या शिवाय आणखी तीन लहान तट या तटाच्या आंत आहेत. या प्रत्येक तटाला मोठा दरवाजा आहे. या दरवाजातूनच किल्यांत जाण्याचा मार्ग नागमोडीचा आहे. जो प्रारंभीं मोठा दरवाजा आहे त्याचेवर पहारा असतो. तो पहारा असून नसल्या सारखाच आहे. कारण एक फाटक्या चिंध्या नेसलेला शिपायी तेथें बसलेला असतो देवडीवर दोन चार बंदुका व एक लहानशा छप्परांत चार तोफा ठेविल्या आहेत त्याच्या कडे पाहत चिलम ओढीत मोठ्या आनंदांत बसलेला पाहरेकरी असा दृष्टीस पडतो. निजाम सरकार कडून महिना बारारों रुपये या किल्याच्या बंदोबस्ता करितां खर्च होत असतो; व पलटणीचा पहारा १५० जवानांचा येथें नेमलेला आहे. परंतु या पैकीं बहुतेक जवान तालुकदार यांच्या तैनातींत अवरंगाबाद येथें असतात. १०।१५ टवाळ लोकांच्या मनांत जर गोष्ट आली कीं किल्ला व गांव यांत दोन तीन दिवस राज्य करावें व किल्यांत असलेल्या इमारतीची नासाडी करावी तर इतकी गोष्ट साध्य करून घेण्यास बिलकुल उशीर लागणार नाहीं. मग इंग्रजाच्या छावणींतले शिपायी सर करून किल्ला किती वेळांत घेतील हें सांगणेंच नको. ज्या किल्याची जरुरी नाहीं ते किल्ले इंग्रजानें किती बंदोबस्तानें ठेविले आहेत ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे आमचे राजे लोकांची स्वराज्याच्या खऱ्या हक्का विषयीं बळकट निराशा व इंग्रजी राज्याची सर्वैव शांतता हीं स्पष्टपणें व्यक्त होतात.

किल्याचें वर्णन करण्यापूर्वीं या गांवीं एक गोष्ट माझ्या पाहण्यांत आली ती सांगतो. निजाम सरकारांतून या गांवीं दोन भाषा शिकविणारी शाळा स्थापन झाली आहे. शाळेतील मुख्य मुसलमान जातीच्या पंतोजीस ३५ रुपये पगार आहे. एक तीन रुपयाचा शिपायी शाळेसाठीं आहे. व एक रुपया सादिलवार खर्चा साठीं मिळतो. सन १८८१ च्या खानेसुमारी वरून असें समजतें कीं या गावांत लहानथोर मिळून १२४३ माणसें आहेत. या लहानशा खेडेगांवच्या वस्तींत इतका खर्च शाळेसाठीं ठेविला आहे तो अयोग्य आहे असें कोणी ही म्हणणार नाहीं. तथापि शाळेची व्यवस्था पाहिली असतां अत्यंत शोचनीय आहे. या शाळेला वर्ष दीड वर्षांत सारवण केलें तें मिळालें नसेल. शाळेतली जमीन सर्व उखडलेली जिकडे पाहवे तिकडे धुराळा. मास्तरांस विचारिलें कांहो, या शाळेचा अशीं व्यवस्था कां झाली. त्यांनीं सांगितलें कीं, तीन रुपये दरमहाच्या शिपयांनें काय काय करावें. शिपायाचा पगार रुपये ६ तरी असावा व सादिलवारास खर्च दरमहा तीन रुपये जर मिळेल तर शाळेची व्यवस्था कांहीं तरी नीट ठेवितां येईल. इतक्या खर्चांत इंग्रजी अमलांत चांगली व्यवस्था राहिली असती हें सांगणें नको. खेडे गावांत ज्या मास्तरास एक शिपायी तैनातीकडे मिळेल तो मास्तर किती सुखी होईल हें सांगणे नको आह्मा लोकांस. जो अभिमान आहे कीं, आमच्या कडे राज्य कारभार असला तर आह्मी व्यवस्था उत्तम रीतीनें ठेऊं त्यां व्यवस्थेंत व इंग्रजाच्या व्यवस्थेंत अंतर पडणार नाहीं त्यांनीं निजामशाही अथवा इतर संस्थानांतील व्यवस्थेकडे पहावें म्हणजे इंग्रजी राज्यांत किती व्यवस्था आहे प्रजेस सुख किती आहे हें त्यांच्या लक्षांत आल्या वाचून राहणार नाहीं.

देवगिरीचा किल्ला फार प्राचीन काळीं सुद्धां दक्षिणेंतील राजांस स्वराज्य संरक्षणाचे कामीं फार उपयोगी पडला. मुख्य दरवाजांतून थोडेसें आंत गेलों म्हणजे उजव्या बाजूस मोठा मनोरा आहे. त्याची उंची २१० फुट म्हणजे भकम ३५ पुरुष आहे. मुंबल-

मान लोकांनीं इ. स. १२९४ हा किल्ला सर केला. त्यांचें हें स्मारक आहे. मनोरा अद्याप नसावा तसाच आहे. त्याला कोठें ही धक्का लागला नाहीं. मनोऱ्याच्या बाजूस मोहोळ सध्यां फार लागलें आहे म्हणून निजाम सरकाराच्या लोकांनीं वर जाण्याची मनाई ठेविली आहे. मनोऱ्यावर गेलें असतां असमंतातील प्रदेशाचा फारच रमणीय देखावा दृष्टीस पडतो असें सांगतात. मनोऱ्याच्या जवळच जैन लोकांचें विस्तीर्ण मंदिर होतें. तें अगदीं पडून जमीनदोस्त झालें आहे. या मंदिराला लागूनच चिनी महालाची ढासळेली इमारत आहे. या महालांत गोवळकोंडे येथील शेवटला राजा तानशा अवरंगजेबानें आपल्या कैदेंत ठेविला होता. हा किल्ला ज्या टेंकडीवर आहे ती टेंकडी जमिनीपासून सुमारें ६०० फुटी ह्मणजे भक्कम १०० पुरुषें उंचीची आहे. दक्षिण बाजूस बरेच लहान मोठे डोंगर आहेत परंतु किल्याचा डोंगर त्यांस लागलेला नसून अगदीं निराळा असा आहे. दोन तीन देवडी दरवाजे वलांडल्यावर मोठा खंदक लागतो. ह्याची रुंदी सुमारें ३० फूट आहे खंदक वलांडून जाण्याची सोय हटकी ह्मणजे एक लहानसा अर्धा दगडी व लाकडी असा पूल केलेला आहे. हा पूल वलांडला ह्मणजे डोंगर पोखरलेला नाग मोडीचा व लहान असा किल्याच्या शिखराकडे जाण्याचा रस्ता आहे. ह्या मार्गांतून आक्रमण करून वर चढावयाच्या दरवाजावर आलों ह्मणजे त्या ठिकाणीं जोडी व भारी असा लोखंडाचा पत्रा ठेविला आहे. शत्रु त्या दरवाजा पर्यंत जरी आला तरी त्याचा पुढें शिरकाव होऊं नये ह्मणून तो पत्रावर जाण्याच्या रस्त्याच्या मुखावर ठेवावयाचा, व त्यावर प्रज्वलित अग्नि पेटवून शत्रूची पिच्छेहॉट करावयाची. पऱ्याबरील अग्नि पेटला ह्मणजे वर सांगितलेला जो डोंगरांतून पोखरलेला रस्ता तो अत्यंत तापून जातो व शत्रूस मागचा पायच काढावा लागतो. प्राचीनकाळीं हिंदु लोकांत ह्या किल्याची प्रसिद्धि देवगड अथवा देवगिरी या नावानें होती. पूर्वीं यादव नावाचे जे दक्षिणेंत राजे झाले त्यांचे विजापूर हें राजधानीचें स्थळ होतें. पुढें विजापूर बदलून देवगडी राजधानी झाली. अल्लाउद्दीन खिलजी हा ८४०० घोडा घेऊन इ. स. १२९४ त देवगिरी समोर येऊन धडकला. गावाचा विध्वंस करून तीन सप्तक किल्यास वेढा देऊन बसला. हा हल्ला एकाएकीं झाला ह्मणोन रामचंद्र राजास किल्यातील लोकांचा पुष्कळ काळ बचाव करण्याजोगें अन्न जमावून ठेवण्यास अवकाश सांपडला नाहीं यामुळें रामचंद्र राजास अल्लाउद्दीन खिलजी यांस शरण जावें लागलें. बाराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं यादव कुळातीलकलचुरी राजांनीं या ठिकाणीं आपली गादी स्थापिली होती त्या घराण्याचा या वेळीं पराजय झाला. रामचंद्र व अल्लाउद्दीन यांमध्यें जो तह झाला त्याची कलमें खालीं लिहिल्या प्रमाणें होती असें फेरिस्ताचें ह्मणणें आहे. १०० मण सोनें, सात मण मोत्यें, दोन मण जवाहीर, हजार मण रुपें, ५००० रेशमाची ठाणें आणि आसमंतांतील प्रदेशासकट वऱ्हाड प्रांतांची राजधानी एलिचपूर व दर वर्षीं निराळीच खंडणी इतक्या गोष्टी रामचंद्र राजानें कायावया असें या तहांत ठरलें. मुसलमानी लोकांचा दक्षिणेंत हा पहिला प्रवेश मुसलमानांचा हा जयोत्कर्ष फार वेळ स्वस्थपणें राहिला नाहीं. रामचंद्रानें १३०६ त बंड केलें. त्याचा बीमोड करण्यास सेनापति मलिक नायब कफुर याची देवगिरीकडे रवानगी झाली. रामचंद्रास कैद करून दिल्ली मुक्कामीं धरून नेलें. तथें सुलतानानें त्याचा आदर सत्कार करून त्याला दयेनें वागविलें आणि पुढें कांहीं वेळानें रामचंद्रास आपल्या राज्यांत परत पाठविलें. राजा रामचंद्र मरण पावल्यावर त्याचा पुत्र शंकर गादीवर बसला. त्यानें बादशाहाशीं शत्रुत्व करून मलिक नायब कफूर यांच्या हातून आपल्या जीवाचा व राज्याचा नाश करून घेतला. कफूर परत गेला त्यावेळीं त्यानें या किल्याचा व दक्षिणेंतील अगाव दुसऱ्या स्थलांत बंदोबस्त केला होता परंतु त्यास इकडे पाठफिरविण्याचाच अवकाश रामचंद्र राजाचा जावई हरपाल यानें बंड उभारलें. पुनरपि मुसलमानी सैन्य किल्यापुढें येऊन धडकलें. या सैन्यानें हरपालाचा पराजय करून हरपलास हगरतत केलें. मुबारिक खान या नावांचा जो नवीन सुलतान यानें हरपालास देवगिरीच्या दिल्ली दरवाजा समोर जिवंत जाळलें. यापुढें दिल्ली ऐथील बादशाहाच्या मर्जींतल्या लोकाकडून या प्रांताचा कारभार इ. सन १३२५ पर्यंत चालविला. पुढें महमद तघलख बादशाहाच्या मनांत असें वेड शिरलें कीं, मुसलमानी तक्ताची मुख्य राजधानी देवगिरी या ठिकाणीं करावी. या हेतुनें त्यानें या किल्यास दौलताबाद असें नांव देऊन प्रजेस सक्त हुकूम दिला कीं तुह्मी दिल्ली शहर तावडतोब सोडून दौलताबाद शहरीं प्रयाण करावें. दोन्ही शहरांतील अंतर कमींत कमी ४८० कोस. ह्या खुळ्या व निर्दयी बादशाहाच्या हुकमानें सर्व जगांत नावाजलेलें दिल्ली शहर, जंगला सारखें उद्धिग्न झालें. कथा अशी सांगतात कीं, एक अंधळा व एक अर्धांग वायूनें ग्रस्त झालेला अशीं दोन माणसें दिल्लींत मागें राहिलीं होतीं. अर्धांग झालेल्या माणसास सर्पिणी नावाच्या तोफेच्या तोंडीं उडवून दिलें. अंधळ्यास सरपटत ओढीत देवगिरीस आणलें. देवगिरीस त्याचा पाय मात्र येऊन पोहाचला. बाकीचें सर्व शरीर रस्त्यात झिजून तुकडे तुकडे होऊन गेलें. महमद तघलकाचे वेळीं इबनबटुरा या नावाचा आफ्रिकेंतील तनजीर येथील रहिवासी दौलताबादेस आला होता. त्याच्या ह्मणण्या प्रमाणें असें दिसतें कीं, दिल्ली सारखाच देवगिरीचा विस्तार वाढला होता व शोभाही त्याच प्रमाणें झाली होती. या प्रमाणें दिल्लीचा त्याग दोनदां झाला आणि दौलताबादेचें महत्त्व वाढलें. दुसऱ्या प्रसंगीं प्रवासाच्या दुःखास दुष्काळाची भरती होऊन येणाऱ्या लोकाचे हाल झाले. तघलख घराणें जाऊन त्यांच्या जागीं बाहमणी व बेदरचे राजे या ठिकाणीं राज्य करूं लागले. बहिमणी राज्याचा विध्वंस इ. सन १५२६त झाला. तो पर्यंत त्यांच्याच ताब्यांत देवगिरीचा किल्ला होता. पुढें अहमदनगरचे निजाम शाहीराज्य झालें त्यांच्या हातांत किल्ला होता पुढें मोगलांनीं या राज्याचा नाश करून किल्ला आपलें स्वाधीन करून घेतला. इ. स. १७०७त अवरंगजेब मरण पावला त्या काळा पासून अद्याप पावेतो निजाम सरकारच्या ताब्यांत आहे. निझाम यांच्या कुळाचा असफजा आद्य स्थापक होता. आसपासचा मुलूख त्याच्या हातात आला. आज करीब वर्षें लोटलीं ह्या किल्यावर फौज फाटा ठेविला नाहीं. ह्या ठिकाणीं पूर्वीं सुप्रसिद्ध असें बागबगीचे असत, परंतु साम्प्रत त्यांचा मागमुसही नाहीं. किल्यावर बारद्वारी ह्मणून फारच सुरेख व रमणीय अशी बसावयाची जागा आहे. तेथून आसपासच्या व याच भागाचा उत्तम असा देखावा दृष्टीस पडतो. किल्याच्या शिखरावर मुलुख मैदान व काळीं या नावाच्या फारच मोठ्या तोफा ठेविलेल्या आहेत. ह्या इ. स. १३१०-१४०० शतकांत हिंदुकारागिरांनीं बनविल्या असाव्या.

किल्यांत जनार्दन स्वामीची समाधीची जागा एका अंधाऱ्या गुहेंत आहे. गुहेंत गुडघाभर पाणी आहे; व मशाली वाचून कांहींच दिसत नाहीं स्वामीची बसावयाची जागा ओव्या सारखा एक खडकाचा भाग आहे त्यावर होता असें सांगतात. ह्या ठिकाणींच ते समाधिस्त झाले अशी कथा सांगतात. किल्या पासून तीन कोसावर फार मोठा तलाव आहे त्या ठिकाणीं अरुणोदयीं स्नान करून पुनः सूर्योदयाच्या आगोदर किल्यांत परत जात अशी ही एक कथा प्रसिद्ध आहे.

ज्यावर किल्याचा मुख्य भाग आहे त्याचा खडक १५० फुटी उंच असा एक सारखा भिंती प्रमाणें साफ खोदला आहे. १०-१२ कोसावरून ही खडकाची भींत दृष्टीस पडते खंदकाची किल्या कडील बाजू ही भींतच आहे; व दुसरीकडे किल्यात प्रवेश करण्याची बाजू आहे.

वऱ्हाडसमाचार

मित्ती चैत्र वद्य ११ शके १८१३

## लोकमत वृद्धि

( १३ वे अंकावरून पुढें चालूं. )

लोकांस आपल्या अडचणी दूर होत नाहींत व गरिब गुरीबास कष्ट करून ही पोटभर अन्न खाण्यास मिळत नाहीं असें झालें म्हणजे सर्वत्र लोकांचे उद्गारा वरून असें स्पष्ट दिसून येई कीं, त्याना त्या यातना खरोखर सोसाव्या लागत शिवाय ते उद्गार एकाचे कीं दोघाचे. शेंकडों जणांचीं—मोठ्या पोक्त विचारी व वजनदार गृहस्थां पासून तों अशिक्षित गरीब कुणव्या पर्यंत—एकच गाऱ्हाणीं ऐकूं येऊं लागलीं तेव्हां तर त्यांचा पक्ष अधिकच दृढ झाला. राजा व लॉर्डस हे जरी त्यांचे विरुद्ध होते तरी इतर सर्व प्रजेचें एकमत असल्या मुळें आपणास यश येईल अशी त्यांना उमेद होती. शिवाय वर्तमान पत्रांची मदत त्यांच्या फार उपयोगीं पडली ठिकठिकाणच्या सभांत जे जे ठराव होत त्या ठरावांची सर्व कच्ची हकीमत वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होई. वेळो वेळीं पाठविलेले अर्ज, जाहिराती व माहितीपर लहान लहान पुस्तकें लोकांत फुकट वांटून देण्याचा परिपाठ ठेवला. वेळो वेळीं सभा भरवून पार्लमेन्ट मध्यें लोकांचे संबधानें जे ठराव होत ते लोकांना उत्तम प्रकारें मोठमोठाली पुढारी मंडळी समजून देत या मुळें घरीं दारीं विश्रांतिगृहांत, चव्हाट्याच्या जागीं, मित्र मंडळींत सार्वजनिक प्रश्नांची वाटाघाट होऊं लागली. देशांतील सर्व शहाण्या व पोक्त मंडळींचे विचार वर्तमान पत्रद्वारें लोकांस समजल्या मुळें सार्वजनिक प्रश्नांची शहानिशा उत्तम प्रकारें होऊं लागली. सत्कृत्य असलें म्हणजे उत्तम प्रकारच्या मुत्सद्यांचें सहाय मिळतें. व तसें सहाय्य मिळाल्यामुळें सदुपायांची योजना होऊन कार्य सिद्धी हटकून होते. अशीच या रिफॉर्म बिलाची अवस्था झाली. पार्लमेन्ट मधील मोठ मोठ्या नामांकित सभासदांची आंतून या लोकांना मदत मिळाली. व तेणें करून फार उपयोग झाला. मध्यम प्रतीचे व समजूतदार लोकांना असें वाटलें कीं, ही गोष्ट फार स्तुत्य आहे म्हणून अशा थोर पुरुषांची मदत मिळत आहे. तर आपण ही या कृत्यांतला वाटा उचलावा व यथाशक्ति या कृत्यास हातभार लावण्याची खटपट करावी. शिवाय दुसरी लक्षांत ठेवण्या सारखी गोष्ट ही कीं, सरकारचे विरुद्ध वर्तन करण्याचा या लोकांचा इरादा नव्हता. त्यांना असें वाटत होतें कीं, फ्रेंच लोकांचें अनुकरण जर आपण सर्वथैव करूं तर आपला सर्वस्वी नाश होऊन आजपर्यंत आपणास जे हक्क संपादिले आहेत त्यांस ही पण आपण मुकूं. या मुळें ते मोठ्या उत्सुकतेनें प्रधान मंडळाचा पक्ष उचलून हळू हळू युक्तीनें व गोडी गुलाबीनें आपले हेतु सिद्धीस नेऊं लागले. वळोवेळीं लोकांची मान खंडणा व मनोभंग होई व त्या मुळें ते आवेशांत येऊन बिथरत. परंतु बे कायदेशीर वर्तन त्यांचे हातून न होण्या विषयीं पुढारी मंडळी पुष्कळ खटपट करी. या वेळीं बर्मिंग हाम येथील मंडळी पुढें सरसावली. ज्या वेळेस हा कायदा प्रथम पास झाला नाहीं त्या वेळेस तर या लोकांना अधिकच चेव आला त्यांना सभा सदांची निवडणुक होण्याचे वेळीं आपलें वजन खर्च करून आपल्या पक्षाला अनुकूल अशा लोकांची निवडणूक केली मग पुन्हां पार्लमेन्ट मध्यें तें बिल आलें. या बिलावर ज्या वेळेस वादविवाद व्हावयाचे ठरलें होतें त्या वेळेस बर्मिंग हॅम या शहरीं दीडलाख लोकांची प्रचंड सभा भरली व त्यांनीं त्या वेळेस असा ठराव केला कीं, जर हें बिल पास होणार नाहीं तर जान हॅम्पडनचें अनुकरण करून रयतेनें बिलकूल कर देऊं नये. असा लोकांचा निग्रह पाहून उमरावांना भीती पडली. त्यांना या वेळेस लोकांशीं एकनिष्ठेनें सामना करावा लागला असें असतांही त्यांनीं बिलकुल धैर्य सोडलें नाहीं. व शेवट पर्यंत आपला पक्ष उचलून भांडत होते. दुसऱ्या वेळेस ही त्यांनीं बिल पास केलें नाहीं. मग लोकांचा क्षोभ अतिशयच खवळला, त्यांनीं उघडपणें खूनच धामधूम चालविली त्यांनीं विरुद्ध पक्षाकडील लोकांवर हल्ला केला व मारहाण चालविली पुष्कळ बेकायदेशीर वर्तन केलें, शेवटीं न्यूहाल हिल, स्टॅफर्ड,

बॉरवुइक, वुरांसस्टर वगैरे ठिकाणीं दीड दोड लाख लोकांच्या सभा भरविल्या व रिफार्म बिल पास झाल्या शिवाय हाऊस आ० का० चे सभासद यांनीं वार्षिक खर्च करण्यास मंजुरात देऊं नये अशा विषयीं कॉमन्स लोकांना अर्ज पाठविला. असे दररोज शेंकडोंशें अर्ज येऊं लागले. जों जों लोकांचा प्रतिबंध होई तों तों लोकांचीं मनें अधिकच अस्वस्थ झालीं. व दंगा अधिक मातत चाइला. अशी स्थिति दृष्टीस पडल्यावर लॉर्डस लोकांना वाटूं लागलें कीं, लोकांना न आवडतील असे कायदे करण्यांत अर्थ नाहीं. व लोक जें मागत आहेत तें कबूल करणें फायदेशीर आहे. मग रिफार्मबिल निमूटपणें पास झालें. या कार्यांत लोकास यश मिळालें याचीं कारणें कोणतीं ह्मणाल तर १ हें कार्यच फार उत्तम व लोकोपयोगी व न्याय्य होतें. दुसरें सर्व लोकांनीं मध्यम प्रतीचे लोकांपासून तों मजूरदार लोकांपर्यंत एकत्र होऊन मोठ्या नेटानें धैर्य न खचूं देतां अव्याहत परिश्रम केले. तिसरें, प्रमुख मंडळी फार शहाणी व पोक्त विचाराची होती. चौथें. हाऊस ऑफ् लॉर्डस मधील बऱ्याच सभासदांचें चांगलें पाठबळ होतें. पांचवें वर्तमानपत्रांचा सरकारावर अतिशय वचक बसला होता. व तीं एकूण एक लोकांस अनुकूळ होतीं व त्यांनीं देशांत अतोनात परिश्रम करून चळवळ सुरू ठेविली. हें बिल पास होतांना लोकांनीं पुष्कळ धामधूम केली व त्यामुळें त्यांच्या प्रयत्नांस थोडासा डाग लागला खरा परंतु या वरून त्यांस असें कळून आलें कीं, यश मिळविण्यास धामधूम किंवा पुंडाई माजविण्याची बिलकूल अवश्यकता नाहीं. हें त्यांच्या पुढील आचरणावरून स्पष्टपणें दिसून येतें.

(पुढें चालेल.)

# The Berar Samachar

MONDAY, MAY 4, 1891.

It is a matter of surprise that our English friends know of us better than we do ourselves. But this is singularly true with reference to our material advancement in the scale of other nations. We bring in this proviso with the express intention of pointing out the mistaken notions that our well-wishers convey in regard to the social movements of the diversified races and creeds of the Indian subjects. Until they live our lives and eschew our manners and customs we must profess that they are unfit more or less as judges of the different social institutions of the Native ryots of which the Hindus and the Mahomedans are the two grand factors. The British Committee of the National Congress with its staunch and steady adherents has been doing an excellent work through its organ—'India'—a journal of world-wide reputation for the discussion of Indian affairs. Every latest number of 'India' abounds with matters that present in right colours the consequences of the British mode of rule in India.

The whole nation trembles on the brink of poverty and it is a sad duty to remind our benign Govt. of the dark side of their administration in India. We are fully aware that our rulers mean well but don't fulfil it. In the trust of India committed by providence to their care there is the grand fault—much of omission and not of commission. In the presence of the great spending administrative departments and in the conflicting and antagonistic interests between the tax-payers and the tax-eaters there is no possible hope of peace, reform and economy unless the English nation is aroused to their sense of duty to India by thinkers of vast abilities and comprehensive powers of adjusting complex and intricate matters of national problems. Mr. Dadabhai Naoroji was the pioneer to open up the subject of the poverty of India. Whatever may be the goodness of the present Govt. it is a stern fact that all the material resources in India are unintentionally developed for the perennial benefit of the ruling nation in the eventual spoliation of India. Mr. William Digby who is the champion of Indian interests in Great Britain has disclosed in a masterly manner the true state of the whole nation. His open letter to the House of Commons is an interesting and statesmanlike record teeming with accurate facts and minute details. It will repay even ten thousand perusals and broadcast publications in the living languages of this country. Mr. J. Seymour Keay M. P. is another gentleman who has studied Indian problems with a scientific pursuit and scholarly acumen. He has ably portrayed 'the double feat of forcing up the taxation to starvation point and yet loudly protesting that they are taking from a cultivator only a small share of the produce of his fields. Mr. Keay has attacked with the vehement tenacity of purpose and the honesty of intention the 'inestimable blessings of the British rule in regard to the irrigation canals'. It has been further demonstrated in his letter that India's railways made on a scale in excess of requirments have carried off to England more capital. He has exploded, in the manner of the valuable pamphlet of the last year issued by the Poona Sarvajanik Sabha, the theory that the enlarged exports of India are unanswerable proofs of its prosperity. The question of the increase of the population bearing on the poverty of the nation has not been so dealt with as to elicit conviction to the reader. The concluding portion of the most damaging and most trenchant description of the spoliation of India by Mr. Keay is worth repetition *in toto* and we request our readers to remember the points he has suggested in the smart style of a keen observer.

"The means then, by which, amidst its own bankruptcy, India has managed to maintain the solvency of its alien government, may be summed up as follows:—

Less fallows;
Less manure for the soil;
Less food for the people;
Less fuel for cooking the single meal;
Less food for cattle;
Less labour devoted to house building and other industries not directly necessary to produce crops;
Fewer and fewer cattle:
A smaller and smaller dole set aside for religious duties, and for occasions of joy and sorrow;
Fewer and fewer ornaments;
Less leisure;
More debt;
Fewer clothes;
More death.
"And they cried, O Lord! how long?"

Yet another question may be asked. If our rule has proved a source of such dire impoverishment and suffering, how comes it that so large a mass of human beings is found submitting passively to such a galling yoke?

There are many circumstances which have contributed hitherto to the maintenance of our rule, in spite of the sufferings it causes. The chief of these may be enumerated as follows:—

1. The peculiarly amiable and law-abiding character of the people, and the extraordinary patience they evince under the most acute privations.

2. The fact that our Government have secured a monopoly of artillery without which no modern army could take the field.

3. The fact that all wisdom, whether political, administrative, or military, gained in the administration, is monopolised by aliens, & perpetually carried off by them from the country.

4. The fact that, thus ostracised from political intelligence, all native ability has been atrophied for several generations, and that India now presents the unique spectacle of a vast nation cut off from all the opportunities which bring reforming leaders to the front. The result is that the masses, without leaders feel the pressure growing tighter, but only partially understand what is its cause.

5. The fact that we are admirable organisers and scientific adjusters of financial burdens, so that we insidiously grasp a greater share of the people's substance than they are aware of.

6. The real fairness wherewith we extract, not from one, but from all the agricultural classes, as much as they possibly can pay, thereby obviating all local jealousies.

7. The personal character for purity which our officers are justly enabled to sustain in the minds of the people, their extortions being all legalised, & carried on on behalf of the public treasury, and not for their own individual good.

8. The sense of irresistible force generated in Indian minds by the fact that it has fallen to our lot to introduce to them the appliances of steam machinery, and other embodiments of power, which impress the imagination.

9. Our endless protestations of principle, and ingenuity of extenuation. The unremitting strain of general self-laudation indulged in by our officers, to the effect that they are always acting for the benefit of the people of India, and never for the interest or advantage of their own class.

10. The ever present wistful belief that a man like Lord Ripon may at any time be sent from England as their ruler, directly commissioned by the English nation to overturn the existing system of officialdom, and give them new hope in the depth of their distress.

For all these reasons the people will undoubtedly suffer the pangs of poverty and hunger to a lower point than would any other nation, before they rise, if indeed we wait until they rise, & destroy

A system of Government

which, in spite of many ameliorating features, and notwithstanding a true desire for India's good entertained by many of its members, yet, accompanied as it is by slow depletion and starvation, is, as a whole,

The most scientific instrument of National torture that the world has ever seen."
I.

## वऱ्हाड.

मि. आबर्ड सिव्हील व सेशन जज्ज हे उन्हाळ्यांच्या सुट्टींत सिम्ल्याकडे गेले आणि जुडिशिअल कमिशनर कर्नल मेकंझी साहेब हे चिखलदऱ्यास आहेत.

उमरावती हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीं गेल्याच्या मागील रविवारीं वेणी संहाराचे तीन अंक फार उत्तम रीतीनें करून दाखविले संस्कृत मूळाचें पाठांतर चांगलें झालें असून अभिनयादि अविर्भाव यथार्थ वठले.

'सटवाजीराव ढमाले' हा फार्स ही त्या वेळीं झाला परंतु तो निवड कोणास चांगली वाटली नाहीं.

परवां शनिवार रात्रीं मुंबईकर 'परांजपे संगीत नाटक' कारांनीं तरुणी शिक्षण नाटिकेचा प्रयोग करून दाखविला. टिकिटांचे दर वाढविले असतां ही पुष्कळ लोक खेळ पाहण्यास मोठ्या उत्कंठेनें लोटले परंतु हा खेळ पाहून बहुतेकांची निराशा झाली असावी असें लोकांच्या तोंडून अखेरीस निघालेल्या उद्गारा वरून वाटलें. नाटकवाल्यांनीं यथाशक्ति आपापलीं कामें बरीं केलीं परंतु हा खेळ लोकांस रुचला नाहीं. पुण्या मुंबईकडे या मंडळीचा सदर्हु खेळ निमित्त बाहवा झाली असून अकोल्यास असा भिन्न प्रकार दिसून येण्याचीं कारणें आम्हांस निराळीं वाटतात. रा. रा. नारायण बापुजी कानिटकर यांनीं ही नाटिका रचली ती वस्तुस्थितीस अनुलक्षून आहे या खेळाची खरी किंमत कळण्यास स्थलविशेष, पुण्याच्या फिमेल हायस्कुला विषयीं लोकांचे बरे वाईट आक्षेप, इंग्रजी पद्धतीच्या शिक्षणानें कांहीं प्रत्ययास येत चाललेले घरगुती अनर्थ इत्यादि गोष्टी लक्षांत आणिल्या पाहिजेत. स्त्री शिक्षणाचे परिणामांचें दिग्दर्शन यांत यथार्थ आहे तरी प्रस्तुतच्या इंग्रजी रिवाजाच्या शिक्षणा विषयींचें भविष्य कथन विपर्यासपर असल्या कारणानें लोकांस असली सामाजिक स्थिती रुचेना मग रंगभूमिवर पाहिल्यानें मनाचा क्षोभ होणें साहाजिक आहे. परंतु या भविष्य कथनांतील थोड्या बहूत गोष्टी ज्या लोकांच्या नजरे समोर घडतात त्यांना अशा गुप्त प्रकारच्या स्फोटानें तरुणीशिक्षणाचें चित्र फार आवडलें. ग्रंथकर्त्याची लेखणी दोषाकडे विशेष वळली आहे तरी त्यांत लोकांस भावी कच्छद गोष्टी संबंधानें जागृत करण्याचा त्यांचा हेतु चांगला सफळ होता हें लक्ष्यांत ठेवण्या सारखें आहे. या नाटिकेंतील शिक्षणाचे दुष्परिणाम आमच्या इकडे दृग्गोचर नाहींत व मुंबई पुण्याच्या धर्तीवर शिक्षण मिळून' दादाजी आणि रखमाबाई' याप्रांतांत अद्याप निपजल्याचे ऐकिवांत नाहींत. त्या अर्थी हा खेळ लोकांच्या अटकळीच्या बाहेरचा असल्यानें त्यांस हें कथानक अव्वल पासून बिलकूल आवडलें नाहीं, आणि त्यामुळें प्रेक्षकसमूहाच्या मनाचा हिरमोड झाला हें सांगणें आह्मांस भाग आहे.

येथील पोस्टमास्तर मि. डब्यु मेबेरी हे दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार असून त्यांच्या रजेंत इलिचपुरचे पोस्ट मास्तर मि. डी. मास्क्रिफ हे येथें काम पाहतील. उभयतां गृहस्थांनीं अकोल्यास आपली कारकिर्द चांगली सुखावह केली असल्याचें आम्हांस माहित आहे. इलिचपुरास उमरावती आफिसचे हेड क्लार्क मि. व्यंकटस्वामी यांस पोस्ट मास्तराचे जागीं रवाना करणार आहेत.

शेगांव मुनसिपालिटीचे वार्ड नंबर १ साठीं मि. कावसजी एदलजी मेथा यांस बहुमतानें निवड झाल्याचें सेक्रेटरी कडून कळविण्यांत आलें आहे.

## वर्तमानसार.

—केप येथें बोएरलोकांचे हल्ले होण्याची मोठी भीति आहे. ५००० बोएरलोक तयारी करीत आहेत.

—अफूच्या व्यापारा संबंधानें पार्लमेंटांत जो ठराव झाला त्या संबंधानें विलायत सरकाराकडून हिंदुस्थान सरकारास आद्याप कांहींच हुकुम आला नाहीं. सहा कोट रुपये दुसऱ्या रीतीनें वसूल करण्याचें मोठें संकट आहे.

—उत्तर आर्काटमध्यें मोठा दुष्काळ पडण्यास आरंभ झाला असें समजतें. सु० प०

सर्प दंश झाल्या बरोबर कांदा आडवा चिरून त्याचे एक भेतूक जखमेवर दाबून धरावें ह्मणजे त्यांत वीष उतरून तें हिरवें होऊं लागतें. हिरवें झाल्या बरोबर तें काढून टाकून दुसरें भेतूक लावावें. या प्रमाणें १।२ कांद्यांचा उपयोग केला ह्मणजे साफ वीष उतरतें. दंश होऊन मध्यें बराच वेळ गेला असला तर अमेरिकन लोक त्या जखमेवर काड्ये खाराचा उपयोग करितात. त्यानें जखमेंतील वीष जळून जातें. ह्या सुलभ उपायाचा लोकांनीं अनुभव घेऊन पहावा. स. बो

इंग्लंडचें नव्या सालचें बजेट प्रसिद्ध झालें असून त्यावरून असें दिसतें कीं चालू सालीं अदमासापेक्षां १,१८,००,००,००० रुपये जास्त उत्पन्न झालें. या राज्याला एकंदर आज मितीस ६, ९०,००,००० रुपये आहे नव्या सालीं १,९०,००,०० रुपये उत्पन्न वाढेल व २,००,००,००० रुपये शिल्लक राहील असा आदमास आहे; यांपैकीं १,००,००,००० रुपये फुकट शिक्षणाकडे खर्च केले जातील ९०,००,००० रुपये नाकी नीटकरण्याकडे खर्च होतील या अंदाजावरून विलायतचे लोक अधिकाधिक दारूबाज होत आहेत पण नियंत्रित राज्यव्यवस्था असल्यामुळें खर्च उत्पन्नापेक्षां वाढत नाहीं. शिक्षणाकडे मोठी रक्कम खर्च होते पण हिंदुस्थानांत इंग्रज सरकार शिक्षणांतून आपलें आंग कढून घेत आहे!

बनारस येथील दंगा करणाऱ्या लोकांपैकीं सुमारें ५०० लोकांस कैद करण्यांत आलें आहे.

जो ज्योतिषी अर्धा तासपर्यंत विस्तवांच्या आगींत बसून राहील व कोणत्याही प्रकारची दुखापत न होतां बाहेर पडेल त्यावरच लोकांनीं विश्वास ठेवावा व त्यासच ज्योतिषी मानलें जाईल असें सयामच्या राजानें ठरविलें आहे!

मद्रासचें बंदर विशेष मजबूत करण्याकरितां १९ लाख रुपये कर्ज काढण्याचें घाटत आहे.

इंग्लिश फौज जो हल्ला करीत करीत आहे त्याविरुद्ध आपला बचाव करण्यासाठीं मणीपुरी लोक झटत असल्यामुळें त्या प्रांतांतील लोकांची खेडीपाडी इंग्लिश फौजेनें जाळून उध्वस्त करूं नयेत असा स्टेट सेक्रेटरीनीं हुकूम द्यावा अशी एक सूचना हाउस आफ कामनसभेंत एका मेंबरामार्फत करण्यांत आली होती. यावर उत्तर देतांना स्टेटसेक्रेटरी ह्मणाले कीं आमचे लष्करी अधिकारी इतक्या बेवकूबपणानें वागतील असें वाटत नाहीं. इंग्रज कामदाराबद्दल स्टेट सेक्रेटरीचा केवढा हा उदार समज! भलतेंशांतील एका गुन्हेगारास प्रथम माफी देऊन नंतर सुळावर चढविणाऱ्या कामदारांची वरील स्तुति अगदीं बेमालूम आहे यांत कांहीं शंका नाहीं. ठा. अ.

आह्मांला मणिपुरच्या लोकांशीं लढाई करावयाची नाहीं, फक्त युवराज व इतर पुढारी, आणि खून करणारे इसमांस प्रायश्चित द्यावयाचें आहे, मुकाट्यानें शरण येतील त्यांना कांहीं इजा पोंचणार नाहीं, असा सरकारानें जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे युवराज व सेनापती यानां पकडून देईल त्यास पांच हजार रुपये, व इतरांबद्दल अपराधाच्या योग्यतेच्या मानानें दोन हजार व एक हजार अशी इनामें लाविलीं आहेत. क० त०

---

रशियन राजकुमारानें हिंदुस्थानांत फिरत असल्याचा मजकूर त्यानें जी नोंद आपल्या रोजनिशींत वेळोवेळी करून ठेविली त्याच्या आधारें आपल्या वडिलास पत्रद्वारा कांहीं गोष्टी कळविल्या त्यांतील शिल्लक भाग येणें प्रमाणें:

गव्हरनर अथवा गव्हरनर जनरल दौऱ्यावर हिंडत असतां थोडें दिवस एका गव्हरनरची व माझी वाटेनें गांठ पडली, त्या अधिकाऱ्यांचे हिंडणें. मुन्सीपाल कमेटी कडून मानपत्रें घेणें आणि अजूबाजूचे संस्थानदाराकडून सत्कार घेणें या वेगळे माझ्या पाहाण्यांत कांहीं आलें नाहीं.

जुनालेख जुन्या इमारती किल्ले वगैरे जुनाट स्थितीचा देखावा हिंदुस्थानांतील लोकांपुढें हरतऱ्हेनें न येण्यासाठीं मोठा यत्न चाललेला दृष्टीस पडतो.

दक्षिणेंत राजमसलतींत नाणावलेलें पुरूष बरेच आहेत पण त्यांत मुख्य सर. टी. माधवराव ब्राम्हण जातीचा, त्याची निवड लार्ड नार्थब्रुकनी केली, हे त्रावणकोर, इंदूर व बडोद्यांत दिवाणगिरीवर होते. तसेंच सरसालरजंग निजाम शाहीतील मयत दिवाण, ग्वालेरचे दिवाण सर. दिनकरराव राजवाडे, जावऱ्यास खानसाहेब आहेत, रतलाममध्यें शहामत आल्ली नावचे गृहस्थ, अलवारचे राजधानींत पंडित मफूल, कोटा संस्थानांतील नवाब फैजअल्लीखान हे पहिल्या नंबरांत व दुसरे नंबरांत आर रघुनाथराव, काजी शाशाबुद्दीन, वैद्य लक्षुमण जगन्नाथ, मणिभाई, जसभाई या शिवाय नवीन होतकरू मंडळी बाहेर येऊं पहात आहे पण यांच्यांत पूर्वींच्या चालींचें वळण मुळींच नसून नवीन हेंगाडी तऱ्हा दृष्टीस पडते.

एकंदर संस्थानें व ब्रिटिश मुलूख मिळून २६,००,००,००० कोट प्रजा आहे; पैकीं सुमारें ६,००,००,००० कोटी प्रजा संस्थानदारांच्या ताब्यांत राहते.

ठिकाठकाणच्या लोकवस्तीचे आंकडे हातीं लागले तेः—

| | |
|---|---|
| ओरिसा प्रांताची वस्ती | ३७,००,००० |
| रजपुताना | १,४७,००,००० |
| म्हैसूर | ३०,००,००० |
| मुंबई | १,००,००,००० |
| नार्थवेस्ट प्राविन्स | १,८४,००,००० |
| निजाम हैद्राबाद | १०,००,००० |

प्रत्येक अधिकाऱ्यांजवळ एक ब्ल्यू बुक ठेवलेलें असतें; त्यांत दंगा कोठे, दुसमान कोण, ह्मणणें काय, दिलें पाहिजे किती, व देण्यासारखें काय, संबंध कसा वगैरे संपूर्ण माहिती प्रत्येक अनुभवीक आफिसर लिहून ठेवीत असतो त्या दाखल्यास अनुसरून त्यामागून येणाऱ्या आफिसराची वहिवाट राहते त्या मुळें सारख्या कृतीनें इकडील इंग्लिश राज्य चाललें आहे.

विलायतेंत हिंदुस्थान संबंधानें दरसाल पब्लिकवर्क इंटरेस्ट, अडमिनीस्ट्रेशन, सिविल फर्लो आणि आबसेंटी आलावेन्स, सुपरन्यूएशन रिटायर्ड आलावेन्स, आर्मीनान इफेक्टिव मिळून ११,८१,४२,५२० रु० खर्च भरावा लागतो.

वर्तमानपत्रास मोकळीक ठेवली आहे, परंतु सरकारी आफिसांतील गोष्ट बाहेर न फुटण्या बद्दल फार बंदोबस्त केला आहे.

वर्तमानपत्र काढणें तर त्याजपासून कलेक्टर शर्त लिहून घेऊन मग परवानगी देतो वर्षास त्याबद्दल माहिती द्यावी लागते, जें बुक छापलें त्याची प्रत पाठवावी लागते, राजकीय संबंधाचे विशेष विचाराची वाटाघाट करणें आमळ धोक्याचें आहे.

इंग्लिश नियम कोणास मनापासून आवडत नाहींत, परंतु कायद्याच्या आंगानें एकदा वाफरण्यांत आले म्हणजे त्याचा रफ्त होऊन ते प्रचारांत येतात त्याचा अनुभव पंजयाब, सतलज वगैरे ठिकाणीं दृष्टीस पडला, बुंदेलखंड व भूपाळ वगैरेकडे या कायद्याची अतिशय थट्टा करतात.

पेशव्याच्या ताब्यांतून इंग्लिशांनीं हिंदुस्थान कंपनीच्या स्वाधीन केल्यापासून इंग्लिश राज्याची रीत फार सुखकारक असें सांगण्यास मला कोणी आढळला नाहीं.

इंग्लिश वळण धरून चाकऱ्या चुकऱ्या मिळवून असणारे लोक इंग्लिशाची वाहवा करीत पण तीही मनापासून केल्याची मला आढळून आली नाहीं.

अर्ल नार्थब्रूक गवरनर जनरल इंडियाची चाकरी सोडून गेल्यावर बार्नेत घाम येथें लंडण झाल्यावर संतोषाच्या गोष्टींत कळावितात कीं, रजपुताना आणि सेंट्रल इंडियांतील राजे रजवाडे उत्पन्नदार ब्रिटीश राज्यपद्धत अप्रतिम असल्या बद्दल गीत गातात. मी इकडे आल्यावर सदाहूची माहिती घेतली तों त्या उलट व्यवहार दृष्टीस पडला. रजपूत राजे अतिशय व्यसनी असत त्यांस कलकत्ता वगैरे ठिकाणीं प्रतिबंधांत ठेऊन थोडा विद्याभ्यास करविला असल्यामुळें त्या बाजूची दिशा बदललीशी दिसते. जयपूरचा दरबार पाहाण्यासारखा आहे येथें केंब्रिज युनिव्हर्सिटीप्रमाणें उत्तम कालेज आहे, दुसऱ्या देशभाषेच्या शाळा असून स्त्री शिक्षणाच्या ही शाळा आहेत. हास्पिटल, पब्लिक गार्डन, पाण्याचा तोटा, अजुबाजुला धरणें, धुराचे दिवे, वितर्णि रामबाग पहाडी किल्ला, मेयोसाहेबांचा पुतळा वगैरे सर्व कांहीं त्या संस्थानदाराचें वैभव पाहून दिपून जाण्या सारखें वाटतें. जर ताब्यांतील लोकांचा हा देखावा तर स्वतः इंग्लिश राज्यांतील मुलखोहाळ्यांत किती गम्मत आणि शांतता असेल असें वाटणें सहजी आहे. माहाराष्ट्र मित्र.

वामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

ह्या सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखावळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्य एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसें होतात. यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकेंद्र (मेंदू) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूची शक्ति वढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहिती चा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.
आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर

---

हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्गणी आगाऊ रु० ५ डाक हांशील ०।=
सहामाही ,, ३ ,, ०।=
सालअखेर ,, ७ ,, ०।८
किरकोळ अंकास..................=४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।-१
दुसरे खेपेस ......०॥-१

Per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,, 1Rs. 8 as
Six monthly............3 ,, 9 as
Single copy...............4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over 10...4as
Repetition per line 2as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXV — AKOLA MONDAY 11 MAY 1891 — NO 18

वर्ष २५ — अकोला सोमवार तारीख ११ माहे मे सन १८९१ इ० — अंक १८

## HEALTH WEALTH & PROSPERITY

जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या व पुतळ्या.

खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा.  खोटा माल घेऊन फसूं नका.

५००००७ वर विकल्या.

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युत्ता रक्ताचें जीवन आहे. जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व हास्पिटलांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यावर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे व त्यापासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचार शिवाय बरीं झालीं आहेत. पाहिजेयाँ हुना तो डाक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा ज्याटरी पासून बरे होतात. संधिवायु, शिरांगत वायु, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, मोंचेंट, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांनवळ असावी हें योग्य आहे. ही ज्याटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर तिसळी आंगठीस रु० ।॥ व पुतळीस ।।, चांदीचे आंगठीस रु.३ व पुतळीस रु. ९, सोन्याचे आंगठीस रु० २० व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक नग जास्त मिळेल. एक पासून सहा नग पर्यंत ट० हा० सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्ही० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहितीचे पत्रका करितां अर्धा आणा पाठवावा.

विकत मिळण्याचा पत्ता:—जी. बी. नाईक आणि कंपनी, मापवळा—मुंबई, बुधवारपेठ—पुणें

---

लोहभस्म केशर मिश्र व — **बलभीम पाक.** — पुष्कळ वनस्पती मिश्रित

एकदम १०० तोळे पाक घेणारास ।। रु. ची विजेची पुतळी फुकट मिळेल.

ह्या पाक लोकांच्या अनुभवास आलेला व थोर लोकांनीं पसंत केलेला व खाण्याला गोड असून (५१६ जिल्ह्यांतील लोकांस गुण आला आहे.) याच्या सेवनानें पुढें लिहिलेले गुण मनुष्याला प्राप्त होतात. [illegible] अनुभवल्या सारखो नेबळाई नाहींशी होते. आंगावर चांगली कांती येते [illegible] शरीर पुष्ट होतें, धातु वाढते, स्मरणशक्ति व लवकरच धातु जाण्याची बंद होते. योग्य वेळीं धातु लवकर पतन होत नाहीं. कामेच्छा वाढते. शक्ति येते. भूक चांगली लागते. शौचाला साफ होतें. डोळ्यांस थंडावा येऊन दृष्टि तीव्र होते. परम्याचा जुनाट रोग जातो. पित्त, आम्लपित्त, दमा, हगवण, आंव हे विकार जातात. स्त्रिया, पुरुष व मुलें यांनीं हा पाक घेण्यास फारच नामी आहे. कितीही तोळ्यांत ३ डबे घेणारास त्या धासल्याचा एकदवा बक्षीस देऊं. दर २० तोळ्यांच्या ड. २॥ रु०, ४० तो० ड० ४॥ रु०, ८० तो० ड० ८ रु०, १०० तोळ्यांच्या डब्यास १९॥ रु०, टपाल व बंगीखर्च निराळा पडेल.

शिफारसपत्र—आपल्याकडून मागविलेला बलभीम पाक मी माझ्या लेकास दिला. त्याची पांडुरोगासारखी भावना होऊन दिवसेंदिवस शरीर प्रकृति तेजहीन आणि अशक्त होते चाल्लो होती, ती आपल्या पाक सेवनानें बरीच सुधारली. पुनः ८० तोळे पाक जरूर पाठवावा. रघुनाथ अनंत जमादार गढ़ग रे० स्टेशन.

शिफारसपत्र—आह्मी तिघा मित्रांनीं मिळून आपला बलभीम पाक २७० तोळे घेतला आणि त्यापासून यावा तसा गुणही आला आह्मी चांगल्या मार्गीं पैशाचा व्यय केला त्याबद्दल आनंद होत आहे. पाक गुणकारी आहे यांत शंका नाहीं. हणमंतराव कल्याणराव, हणमंत कृष्ण वि० व राघवेंद्र व्यंकटेश बिडीकार.

पत्ता— लक्ष्मण आप्पाजी प्रभु धारवाडसूत ऑफीस. मु० धारवाड.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मास कळवावें. मालक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां तिकीट पाठवा.

जी. डी. कानिटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्धा आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

### नोटीस

रा. रा. सखाराम वल्लद कृष्णाजी धामोडे कुणबी हल्लीं राहणार दहिहांडा यांस नोटीस देणार अर्जी मई सखाराम रहाणार बाळापूर नोटिशीनें असें कळवितो कीं तुझ्याशी माझें लग्न होऊन आज अदमासें तेरा वर्षं झालीं. मी राहणी होऊन आज सुमारें सात वर्षं झालीं. तूं ह्या सात वर्षांत चार वर्षें बदमाशी करून तुरुंगांत होतास; तूं मजला घेऊन जात नाहींस, माझा सर्व जन्म व्यर्थ चालला आहे. मजला ह्या सात वर्षांत अन्न वस्त्रा करितां (३९०) तिनशें पन्नास रुपये कर्ज काढून गुजराण करावी लागली. आतां मजला कर्ज मिळत नाहीं वगैरे कारणामुळें तुजला नोटिशीनें कळवितें कीं नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत सदरहूं खावटी रुपये तिनशेंनव्वद रुपये देऊन व तूं चार जातभाई प्रमाणें संसार करून चांगला राहशील अशी खात्री करून देऊन व माझ्या जीवास कांहीं धोका करणार नाहींस अशा ठराव शर्तीवर मजला घेऊन जावें. असें केलें नाहींतर मी दुसरा घरठाव करीन मग माझेवर तुझा कोणत्या ही प्रकारचा हक्क नाहीं. व रुपये ३९० बद्दल फीर्याद करून रुपये वसूल केले जातील व या नोटीशीचा खर्च ही भरून घेतला जाईल म्हणून दिली नोटीस. तारीख ६ मे सन १८९१ इसवी.

(सही)
अर्जी मई सखाराम रहाणार बाळापूर ईच्या हाताची निशाणी असे.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

इंग्रजी राज्याचा विस्तार अवाढव्य आहे इंग्रजीभाषा सर्व जगभर थोड्याबहूत मानानें पसरली आहे, इंग्रजी लोक आमच्यावर प्रस्तुत काळीं राज्य करीत आहेत धनानें, विद्येनें, उद्योगानें वगैरे बहुतेक हरएक बाबींनीं इंग्रजलोक आमच्या पुढें पुष्कळच सरसावले आहेत, ह्मणून ते जें जें कांहीं करतील किंवा ते ज्या ज्या प्रमाणें वागतील त्या त्या प्रमाणें करण्यांत किंवा वागण्यांतच काय तें सुधारणेचें मूळ आहे अशी समज असणें ही एक मोठी चूक आहे. आमचे राज्यकर्ते कांहीं कोणी देव नाहीं आहेत किंवा त्यांच्या हातून जें जें कांहीं घडेल तें सर्व बिनचूकच असेल अशा प्रकारची शिफारस ही त्यांस देवाकडून मिळाली नाहीं आहे. आपणा प्रमाणें तेही मनुष्य आहेत आणि आपणा प्रमाणें तेही आपला देश सुखी करण्याचा व सुधारणेच्या शिखरास नेऊन पोहोचविण्याचा रात्रंदिवस सारखा प्रयत्न करीत आहेत. असें जर आहे तर त्यांच्या उमटलेल्या पावला वरच पाऊल ठेवून व डोळे मिटून चालण्यांत काय मजा आहे. ह्या वरून आमचा इंग्रज लोकांस आमच्याच पंगतीस बसविण्याचा उद्देश आहे असें कोणीही समजूं नये. आमचे सांगण्याचा भावार्थ इतकाच कीं, इंग्रज लोकांमध्यें ही अशा कांहीं वाईट चाली आहेत कीं त्यांच्या वाईटपणा बद्दल ते स्वतः आपला खेद प्रांजळ बुद्धीनें प्रगट करितात परंतु त्याच गोष्टीचें अनुकरण आमच्यातील सुधारणेच्छु मोठ्या प्रेमानें करितात. तेव्हां अशी स्थिती ठेवणें हें आमच्या सुधारकांचे कर्तव्य नव्हे व सुधारणेचा हा मूळ पाया नव्हे आणि म्हणूनच अधुनिक सुधारणेचा पाया चुकीचा आहे असें ह्मणणें भाग पडतें.

अपेय पिणें किंवा अभक्ष्य भक्षणें ह्यापासून अनेक प्रकारचे तोटे आहेत असें ज्यांचे आह्मीं अनुकरण करितों त्यांचेसुद्धां सांगणें असतां व ही गोष्ट चांगली नाहीं असें प्रत्यक्ष आमचें मन आह्मांस सांगत असतां आह्मी मोठ्या खुषीनें त्याचा अंगिकार करितो व समाजाचे सुधारक काय ते आह्मीच किंवा सुधारणा होईल तर आमच्यानेंच अशा प्रकारची निरर्थक बडबड करण्यामध्येंच धन्यता मानून घेतों ह्या सारखी खेदकारक गोष्ट कोणतीच नसेल. 'मी जसें सांगतों तसें कर, करतों तसें करूं नको' अशा प्रकारचा उपदेश एखाद्या सुधारकोच्छूनें आपल्या समाजास करणें निवळ उपहासास्पद होय! समाज गाड्याचे जुं खांद्यावर घेणें फुकाचे काम नाहीं हे जूं स्वहित, धनाभिलाष, आप्त सोयरे व इष्ट मित्रादिकां विषयीं प्रिती भिडस्तपणा इत्यादिकांस फाटा द्यावयास लावते. 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण' अशा प्रकारें वागण्याची रीत न अनुसरतां 'जैसा बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउलें.' हेंच तत्व अंतःकरणांत बिंबऊन ठेवण्याविषयीं खबरदारी घेण्यास आमचे सुधारकांनीं सदोदित तत्पर असलें पाहिजे. नुसत्या गप्पा झोंकल्यानें कोणास;

ही यश प्राप्ति झाली नाहीं. चार चौघांत मोठ्या प्रतिष्ठित पणानें ' मद्य पानाचा निषेध करा, व्यापाराकडे लक्ष द्या, आळस सोडा, बालविवाह बंद करा. व पुनर्विवाहास उत्तेजन द्या ' इ० लांबलचक गोष्टी सांगण्यांत अलीकडील सुधारकांची मोठी तत्परता दिसते परंतु स्वतः वर तसें करण्याचा प्रसंग आल्यास— अ हो! शिवाजी महाराज व पहिले बाजीरावसारख्यानीं आपलें यशध्वजारोपण नुसत्या कोरड्या गप्पा वरती केलें नाहीं. जीवाची कोणत्याही प्रकारें पर्वा न करितां समशेर हातांत घेऊन रणांगणांमध्यें घुसत असत ह्मणूनच औरंगजेब व निजामा सारख्या कबिजान व शूर राजांस भीक नको पण कुत्रा आटोप असें होत असें. तसेंच रामदास किंवा तुकाराम बुवा ह्यांनीं जेव्हां कांहीं अद्भुत चमत्कार करून दाखविले तेव्हांच त्यांची किर्ती पसरली व त्यांचीं वाक्यें ब्रह्मलिखीत वाक्या प्रमाणें सर्व लोकीं मान्य झालीं आहेत आमच्या अलीकडच्या सुधारका प्रमाणें त्यांनीं आमची पाठ थोपटा किंवा आमचे पोवाडे गा असें कधीही कोणास ह्मटलें नव्हते तरी पण ह्यांची किर्ती जो पर्यंत महाराष्ट्र भाषा कायम आहे तो पर्यंत अजरामर आहे. ह्या सत्पुरुषांसारखें पुरुष जर आमच्या ह्या हतभाग्य देशांत निर्माण झाले नसते तर नीति भूतदया इत्यादि जगमान्य सद्गुण वाचक शब्द सुद्धां आमच्या आजच्या कोशात सापण्याची कदाचित् मुष्कील पडली असती. हेंच पुरुष आमचे खरे हितकर्ते. त्यांनीं निरपेक्ष बुद्धिनें व स्वार्थ लाभावर लक्ष न ठेवतां परमार्थ साधून कोणाची ही भीती न बाळगितां जी कांहीं देशसेवा होईल तीच करण्यामध्यें आपलें आयुष्य घालविले ह्मणूनच त्यांनीं स्वीकारलेला मार्ग जगांतील कोणत्याही मनुष्यास व कोणत्याही काळांत कित्या प्रमाणें झाला आहे. हाच कित्ता जर आमचे अधुनिक सुधारक गिरवीतील तर ' लोका ब्रह्मज्ञान ' हा जो दोषारोप आमच्या सुधारकावर आलेला आहे त्याचे बऱ्याच अंशीं निराकरण होऊन सत्पाचा सुधारणूकेचा मार्ग चूकला आहे असें ह्मणण्याची पाळी चुकेल. असो.

ह्या जगांत मुख्य तीन प्रकारच्या सुधारणा आहेत; एक राज्यसुधारणा. दुसरी कलाकौशल्य आणि व्यापार सुधारणा व तिसरी समाज सुधारणा तेव्हां ह्या तिन्ही प्रकारच्या सुधारणा करण्याचीं साधनें आमच्या सुधारकांस कितपत आहेत ह्याचा विचार केला पाहिजे.

परवशतेच्या तीखट सुरीच्या सणसणून झणझणणाऱ्या घावामुळें राज्य सुधारणेच्या संबंधांत चकार शब्दां काढण्यास आह्मी अगदीं असमर्थ आहोंत. जगामध्यें जर कांहीं महापाप असेल तर ते ह्या विषयांत हात घातल्यानेंच घडतें, इतकी पराधीनता आम्हास प्राप्त झाली आहे. राष्ट्र उन्नत स्थितीच्या शिखरास जाऊन पोहोंचविण्याची जी कांहीं साधनें आहेत त्या पैकीं धन व धाडस हींही आहेत; व कला कौशल्य व व्यापार ह्यांची भरभराट होण्यास हींच दोन साधनें कायती मुख्य आहे परंतु ह्या दोन्ही साधनांचा पूर्णपणें अभाव असल्या मुळें आमचा दिवसें दिवस अंतच पाय येत चालला आहे. दैववशांत एका साधनाची जर उणीव दूर झाली तर दुसऱ्या साधनाचा वानवा! ह्या मुळें 'दांत आहेत तर चणे नाहींत व चणे आहेत तर दांत नाहींत' अशी स्थिती होऊन 'आमच्या' सुधारकांच्या 'गप्पा मनी कोरड्या' च ठरतात. तिसरी समाज सुधारणा— येथें बरीक आमच्या सुधारकांस हात पाय हलवीण्यास पूर्ण मुभा आहे खरी व ह्या मोकळीकीचा लाभ हा ते पुष्कळ प्रकारें करून घेतात ह्यांत संशय नाहीं परंतु खेद मानण्याची गोष्ट इतकीच कीं, जेथें आपणास सवड सांपडली आहे तेथेंच आपल्या विद्वत्तेचा आपल्या हिम्मतीचा व आपल्या कर्तुम् अकर्तुम् शक्तीचा प्रभाव दृष्टोत्पत्तीस आणण्याच्या भरीस आमचे सुधारक लागल्या मुळें दिशा भूल होऊन आमचे अधुनिक सुधारक भलतीच कडे वहावत जाऊं पहात आहेत; व आवेशाच्या भरांत ज्ञान दृष्टीस मांद्य आल्या कारणानें कांहींच दिसेंनासें झालें आहे, आणि अशी स्थिती आमच्या पुढाऱ्यांचीं असणें आम्हास सर्व प्रकारें अनिष्ट आहे. करितां एखादें चांगलें ज्ञानझणींत अंजन घालून त्यांची दृष्टी साफ होणें अत्यावश्य आहे. आमच्या समाजाचा पुरस्कर्ता कोणीच न राहिल्या कारणानें वाटेल त्यांस हव्या त्या रितीनें आमच्या समाजावर टीका करून यथेच्छ तोंडसुख घेण्यास सवड मात्र चांगली सांपडली आहे आमच्या सुधारकांसच काय परंतु परदेशी व परधर्मी मि. मलबारी सारख्या लोकांस सुद्धां अव्यापारेषुव्यापार करून प्रसिद्धीस येण्यास आमचा समाज कारणीभूत झाला आहे. आपल्या रिती भातीवर, आपल्या धर्मावर व आपल्या वाडवडिलावर टीका करणें त्यांच्या वर गाली प्रदानाचा वर्षाव करणें हेंच कायतें आपलें कर्तव्य आहे व सुधारणेचा मूळ गद्दा कायती येथेंच आहे आसा प्रत्येक सुधारक ह्मणवून घेणाराचा समज होऊन गेला आहे व चार चौघांत डोकें वर काढून प्रतिष्ठा मिरविण्याचा हाच कायतो स्वल्प उपाय असल्या कारणानें आमचे सुधारक तोंडसुखवेण्यास मुळींच मागें पुढें पहात नाहींत. हो! पैशा वांचून श्रम केल्या वांचून अथवा आंगास कोणत्याही प्रकारची झीज सोसावयास लागल्या वांचून जर सुधारक ही जंगी पदवी मिळती आहे परकी लोकां कडून पाठ थोपटली जात आहे, खाविंदची मर्जी सुप्रसन्न ठेवण्यांत कोणत्याही प्रकारचा अडथळा येत नाहीं व लोकांचें डोळ्यांतील कुसळ काढून आपल्या डोळ्यांतील मुसळ छपविण्याचा जर त्यांस सबड सांपडत आहे तर नुस्ते कागदाचे घोडे नाचविण्यांस व तोंड पाटीलकी करण्यास त्यांनीं तरी माग पुढें का पहावें?

'स्पष्टवक्ता'

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ती वैशाख शुद्ध ४ शके १८१३

---

हिंदुस्थानांस दारिद्य येण्यास अनेक कारणें आहेत त्यांत मुख्य हें होय कीं इंग्लंडचा माल या देशांत फार येऊं लागला व त्या वरील जकात उठवली गेल्या मुळें तो स्वस्त मिळूं लागला. या दोनी गोष्टी मुळें परकीयांचा अत्यंत फायदा होऊन हिंदुस्थानचा न्हास होत आहे. कांहीं वर्षां मागें ज्या जिल्ह्यांत शेकडो काष्टी मागावर कापड विणीत होते त्यां पैकीं सध्यां त्या त्या ठिकाणीं ते लोक पूर्वींचा दाहवा हिस्सा ही सापडणार नाहींत. त्या लोकास निरुपाया मुळें शेतकीचा उद्योग पत्करणें भाग झालें. त्यांच्या कपडाल्त्यास गिऱ्हाईक मिळेना तेव्हां यंत्रानें तयार करणाऱ्या कारखानदारांशी त्यांच्या मागाचा टिकाव लागत नाहींसा झाला. इंग्रजी कपडा स्वस्त पडतो तेव्हां गोरगरिबांस चार पैसे गांठी पडतील अशा प्रकारचा कपडा घेणें नीट वाटतें. त्यांच्या लक्षांत सर्व देशाच्या नफानुकसानीच्या गोष्टी येणें दुरापास्त आहे तशांत असे ही कांहीं पढत मूर्ख व स्वदेशद्रोही लोक आढळतात कीं त्यांच्या स्वार्थी खुशालीच्या व चैनीच्या पदार्थां पलिकडे त्यांची दृष्टी कांहीं एक पुढें पोंचत नाहीं. स्वस्त, छान छोकीचा, व दिखाऊ कपडा त्यांस मिळाला म्हणजे त्यांचा कार्यभाग आटोपला परंतु खरोखर पाहिलें असतां देशी मालच स्वस्त पडतो कांकीं इंग्रजी माल कमी किंमतीस बाजारांत मिळतो. हरी तो फार स्वल्प काळांत फाटून तुटून जातो व देशी कपडा महाग पडला तरी पुष्कळ दिवस सणंग टिकल्यानें त्याची अधीक किंमत भरून मिळते उत्तरोत्तर दिवस फार कठिण येत चालले आहेत तेव्हां आपल्या पुरता तरी माल आपण तयार करून सर्व पैसा देशांत राखला पाहिजे तेणें करून प्रत्येकानें मनावर घेतल्यास हिंदुस्थानांतून लयास चाललेल्या देशी कलांस उत्तेजन मिळून शिवाय लोकांचें कार्य होऊन अन्नान्न दशेस येऊन पोंचत चाललेल्या आपल्या पैकीं कांहीं जणास उद्योग धंदा नवीन काढल्याचें श्रेय येणार आहे.

म्यांचेस्टरचे व्यापारी कसे कबिजाज आहेत हें फ्याक्टरी कायद्या संबंधानें चाललेल्या त्यांच्या खटपटी वरून लोकांच्या लक्षांत येऊन चुकलें आहेच. तशांत आपल्या देशांत कापड फार उणाख निघतें असा हीनिव्वळ प्रकार नाहीं. कांहीं थोड्या जिन्नसा संबंधानें आपला माल विलायती माला समोर हार जाईल तरी नित्याच्या उपयोगांतल्या वस्त्र प्रावरणा विषयी गोष्ट पाहिली म्हणजे देशी कपडा आपलें कांहीं नडू न देण्या इतका विपूल असून चांगल्या प्रतीचा मिळतो. विलायतच्या गिरण्या प्रमाणें या देशांत ही कापडाच्या, कागदाच्या वगैरे गिरण्या भरभराटीस येत आहेत तेव्हां देशी मालाच्या खरेदी विषयीं लोकांचा कृतनिश्चय सांप्रत झाला पाहिजे.

प्रस्तुतचा मनु फार चमत्कारिक आहे. सरकारचा पैगम आपला खजिना भरण्या बद्दल सर्व प्रकारें चालला आहे, सारा वाढत चालला आहे, रेलवेचा फैलाव होऊन सर्व देशभर दुर्भिक्ष्य व महर्गता बळावत आहे रोजगार धंदे दिवसानुदिवस बुडत चालले, प्राप्ती थोडा व कराचा बोजा जबरदस्त असा प्रकार आहे, देना वाढत आहे, अन्नपाण्या वाचून सर्वत्र अबादानी दिसते; न्यायं कोर्टें व सरकार दरबारचा अवाढव्य खर्च इत्यादिकांनीं आमची नागवणूक होत आहे तेव्हां पोकळ सुधारणेला घेऊन किंवा तिचा नडीनाव गाऊन काय लभ्यांश आहे हें आम्हांस कळत नाहीं. अशा बिकट प्रसंगीं आम्हा राजनिष्ट प्रजेस सरकारच्या कानीं कपाळी ओरडण्या हून निराळा उपाय उरला नाही आपल्या भयंकर दारिद्र्याला बाह्य देशावरून येणाऱ्या माला मुळें जी भक्कम व जबर मदत मिळत आहे ती नाहींशी करणें आपल्या हातचें असून व त्या संबंधानें सर्वांच्या मुखीं ओरड होत असून, व आपली पदोपदीं कान उघाडणी होत असून ही जर आपण जागृत होणार नाहीं, स्वतां पुरता स्वदेशी माल वापरण्याचा संकल्प करणार नाहीं व त्या प्रमाणें वागणार नाहीं तर सरकारनें सर्व रयतेच्या सौख्यासाठीं व तिच्या कल्याणा साठीं आमचीं गाऱ्हाणीं एकदोन शतकें तरी कां ऐकावीं किंवा सरकारच्या सौजन्यावर अवलंबून राहून आपला कार्यभाग नियमित काळांत साधेल अशी आह्मी आशा कां करावी हें आह्मांस समजत नाहीं.

पुण्यास देशी माल वापरावयाचा असा कित्येकांचा संकल्प होऊन त्याप्रमाणें त्या लोकांची निराळी मंडळी स्थापिली जात आहे. डेक्कन कालेजच्या विद्यार्थ्यांनीं हा नियम स्वतांस घालून घेऊन त्या प्रमाणें ते वागूं हि लागले आहेत. उमरावती हयस्कुलांत या विषयाचा विचार निघाला आहे. आमच्या वऱ्हाडांत ही कांहीं गृहस्थ अशा निर्धाराचे आहेत परंतु त्यांचा कित्ता सर्वांनीं उचलल्याचें आमच्या पाहण्यांत नाहीं. तेव्हां राष्ट्रोन्नती साठीं प्रत्येकाचें हें कर्तव्यकर्म होय कीं त्यानें होईल तितकें करून देशी मालास उत्तेजन द्यावें व हें सोपें काम करण्यास ते चुकतील तर पुढील पिढ्यांना सर्व सुखापासून आंचवल्याचें पातक त्यांच्या माथीं आल्या वाचून राहणार नाहीं.

---

भारतमित्र कार लिहितात कीं कलकत्यास एक मोठी सभा भरून बहुमतानें विचार ठरला कीं विलायती वस्तूंचा व्यवहार सोडून स्वदेशी वस्तूचा व्यवहार स्वीकारावा. हा उद्देश प्रशंसनीय असून सर्व हिंदुस्थानभर या बाबदींत प्रचंड चळवळ होणें आवश्यक आहे तेव्हां निरनिराळ्या सार्वजनिक सभांनीं, वर्तमानपत्रकारांनीं व इतर लोकसमुदायांच्या संस्थांनीं या विषयाचें उद्घाटन वारंवार करून लोकांस देशी वस्तूंचा विनियोग करण्या विषयीं चांगलें शिक्षण देण्यास आळस करूं नये.

---

इंग्रज सरकारची राज्य पद्धती कांहीं विलक्षण आहे आणि त्यांत राज्याच्या विस्तारा संबंधानें त्यांचे विचार अगदीं अद्भुत कोटींतले आहेत. पेगू देश सर केल्यावर त्याच्या संरक्षणा निमित्त रंगून घेणें भाग झालें. रंगून येथील सुव्यवस्था लागण्यास मंडालें शिवाय कांहीं एक बंदोबस्त होण्याचा संभव नव्हता. मंडालें हस्तगत झाल्यावर त्याच्या नजिकचा ब्रह्मदेशाचा वरील भाग पादाक्रान्त केला तेव्हां स्वस्थता होण्याचा रंग दिसला. लार्ड डफरिन अरल आफ आव्हा झाले, व ब्रह्मी लोकांचें सर्वस्व लयास गेलें तरी त्या देशांत शांतता होऊन राज्यकारभार सुयंत्र चालेना. या राज्यकारभाराच्या सोयी मणिपुर संस्थाना मार्गे चांगल्या जुळण्या सारख्या

होत्या तेव्हां मणिपूरास राज्यक्रान्ती झाली ही गोष्ट इंग्रज सरकारचें दैव फळफळण्यास कारणी भूत झाली असें मानण्यास हरकत नाहीं असें कांहीं जण बोलतात.

मणिपूरचे लोक चांगले लढवय्ये नाहींत. त्यास मागें सरजान एडगर यांनीं दोडेश लोकांविशी जेरीस आणिलें होतें तशांत मणिपूर संस्थान फार छोटेखानी आहे तेव्हां इंग्रज बहादूरांनीं चोहीकडून फौजफाटा गोळा करून मणिपूर कबीज केलें यांत मोठी मर्दुमकी केली किंवा तलवार गाजविली अशांतला कांहीं पर्याय नाहीं. इंग्रजांची फौज मणिपूरच्या राजवाड्यांत शिरली तेव्हां मज्जाव करण्यास चिटपाखरूं सुद्धां राहिलें नव्हतें. सर्व शहर उध्वस्त होऊन राजवाडा ओस पडला होता. मुख्य बंडवाले युवराज व सेनापति यांनीं आपल्या लोकांस समवेत डोंगरा कडे पलायन केलें आहे. त्या उभयतांस पकडण्यासाठीं मोठीं बक्षीसें लाग्लीं आहेत तरी त्यांचा कृतसंकल्प इंग्रजांच्या हातीं लागण्याचा नसून ते मरणास एका पायावर तयार आहेत.

हा मणिपूरच्या मोहिमेचा वृतान्त संपला आतां मणिपूर संस्थानचे लोक दातीं तृण धरून शरण आले आहेत व मणिपूरचे माजी रेसिडेंट कर्नल जान स्टान याचा अभिप्राय असा आहे कीं तें संस्थान खालसा न करितां लोकांची ही हाल अपेष्टा होऊं नये तेव्हां आमचे सरकार या संस्थानची काय वाट लावतात या संबंधानें लोकांचे अनेक प्रकारचे तर्क बाहेर येत आहेत. इंग्रजी अमलदारांचा प्राणनाश झाला आहे त्या अर्थी त्याचा सूड घेणें म्हणजे त्या संस्थानास भारी शिक्षा होईल तेव्हां खरें परंतु आमच्या मतें मणिपूरवाले खरोखरच दयेस पात्र आहेत कां कीं लढायीच्या थरास गोष्टीचा आव आणण्यास अंग्रेज सरकार सर्वोपरीनें कारण आहेत. मणिपूर संस्थान सार्वभौमिणीशीं राजद्रोहानें आरंभा पासून वागलें नाहीं तेथील ब्रिटिश रेसिडेंटास राजद्रोहाची कागाळी करण्यास कधीं कारण दिसलें. नाहीं.

The Berar Samachar

MONDAY, MAY 11, 1891.

## THE MORAL OF THE MANIPUR CAMPAIGN.

The triumphant entry of the English army in the 'city of Jewels' (Manipur) completed practically the warlike proceedings in that state. We are greatly rejoiced at the immediate and early success which the English forces concentrated in the field from the different centres of their head quarters achieved over the rebellious and riotous Manipuris. Though the victory does not redound much to the national credit as an act of military reputation it brings to us manifold blessings with an earnest of a happy end. We attach a singular importance to this unfortunate incident of a short-lived war for more reasons than one.

Upon the inhuman massacre of the English officers in the Residency the Govt was resolved to punish the ringleaders of the military outbreak with the hardest measures of retribution. The sooner the spleen of revenge is satisfied the better. Secondly the early termination to the little war stops the course of all the evils of war and bloodshed and the measure of forgiveness will also be coupled with mild and moderate penalties to the Manipuris who were driven in the poignant need of the times to raise an insurrection against the paramount power. The punitive expedition on Manipur has already cost us more than twelve lakhs of Rupees and the Govt. is not likely to retire till it has thoroughly subdued the turbulent and warlike races of that state. This heavy expense means a great deficit in the coffers of India. The little wars that are at present undertaken are as disastrous and ruinous as the great ones. The resources of the nation are thus sapped and wasted away to satisfy the intolerable demands of the governmental policy of extending the precincts of its already uncontrollable dominions. Fourthly as the Manipur rebellion was not *directly* an attempt to overthrow the sovereign power the early return to order and regularity will save the puny state from misrule and anarchy and with the safety of life and property guaranteed by the British Government the Manipuris who have run away hurriedly to places of refuge will come to their homes and will remain, as before, the loyal subjects of the English nation with which their interests are inseparably bound up by the dictates of loyalty and the irony of fates.

Internal discords and civil wars are ever among the prominent causes of the downfall of a family, a state, or a nation. Illustrations are not wanting to impress this lesson upon our minds History abounds with them. India was never under one king except under the benign rule of the Queen Empress. The Brahmani kingdom, the Mogul despotism, the Mahratha kingdom latterly under the usurping influence of the Peshwas are vivid examples, in the periods of their decline, of the ruinous effects of the heart-burnings rampant in the whole of the nation. The account of the English rule surpasses every other part of the Indian History from a stand point of this principle in its overflowing and striking illustrations. It is of no use to complain of the past. Our remark is intended to force upon the notice of our readers the sad lesson which we ought to learn from our own History. At present there is no tract of land in India which is not British. The native states are in fact more British than the British provinces themselves. With a political officer in the centre of their midst the Native States have nothing enviable of their own. These political officers are neither more or less than the despots of the old times. Her Imperial Majesty is in England but in their persons we have realized most of the Imperial augustness of Her Majesty. Malharrao was dethroned in no time. The Maharaja of Kashmir has been enjoying a probationary dethronement. It is no good to multiply instances. Our point is not to condemn English Government outright but to prove how our weaknesses are the opportunities of Christian intolerance of maladministration.

Manipur is no exception. It had gained the good-will of the Government by an excellent career of honest and loyal services in the past. But there was a revolution in September last. The Maharaja Shurchandra was cursed with two step-brothers who sent him into exile. The British Resident did neither help him nor advice him to quell the rebellion with his own men and money. He was told to go on pilgrimage but found to his surprise at Silchar in a 'pass' that he had *abdicated* the throne. After a lapse of six months of inaction the Government ordered Mr. Quinton to march with 700 gurkhas to Manipur to 'arrest the Jubraj in open Durbar and deport him from the country'. Speculations are rife as to this sudden march. To our mind there is a stroke of policy. In regard to states the Government has the mood of Tiberius. He would reign but would not admit so much. Government-duties are 'multiform and ubiquitous.' But the truth lies in the policy of 'interference' with the inordinate love of power. The Government cannot divide responsibilities with the Native princes. To part with a particle of power they cannot. The political Residents and Agents watch their interests as if with a hope to hold themselves the reign of management some day or other. They are irresponsible for state affairs. 'They remain quite aloof and indifferent when some devils are at work in the internal associations of the state. Such a state is allowed to continue with vague remonstrances and occasional advices till it culminates into a practical disaster when the paramount power takes to itself the sole concern. Even if it does not do so much it brings to the throne a minor with the lion's share at its disposal. Such is the probable fate of Manipur. Sir James Johnstone the late Resident at Manipur advocates replacing ShuraChandrasing or his infant son with a strong political Agent keeping the nominal ruler of the state under tutelage for some time. He argues non-annexation from the view of utility. He sees no good from the annexation as it will obliterate a country of a thousand pretty traditions & as our rule will soon be galling in the extreme to the people who prefer comparative poverty and independence. His strong and powerful argument runs as follows:—

"The advantages of having a Native State in the position of Manipur are too apparent to need much demonstration; it forms a wholesome break in the dead level monotony of our own territory. We are not a highly imaginative race, and our system is often ill-suited to the people. We all readily acknowledge the blessing, the unspeakable blessing, of the "Pax Britannica," and may feel proud to think that India is, on the whole, the best governed country in the world; but while our system suits the inhabitant of the plains of Hindustan and Bengal, it is not quite the same to the inhabitant of the Eastern jungles, and we hardly take in that some of them are better suited by the rough-and-ready rule they are accustomed to than by ours. Apart from this, however, the independence of Manipur has at times been of vital importance to us. Had it not been a native State, with well-organised resources, Kohima with its 545 British subjects must have fallen, in 1879, before its savage assailants, who would have spared none, and in 1885 the British subjects at Kendat must have been murdered before aid could reach them. That we were spared these two catastrophes was due to the break in the dead level, notably in the first instance, because, in addition to the help given by Manipur, the tribes under her did not revolt simultaneously with our own. May not we once again be glad of friendly aid in an hour of need? Then let us remember the constant help given to us in our operations in the Kubo Valley and on the Chindwin in 1886-87, and the immense advantage of the short route into Upper Burma thus afforded by Manipur; still later valuable assistance in the way of carriage furnished during expeditions into the Chin country.

---

Mr. Federic Pincott wrote a long and scholarly note on the 'Hindu marriage agitations' from which we cull below a paragraph on the merit of the Hindu Religion as a systematic whole.

'Everything tending to the peace and well-being of society, and the safe and enduring principles regulating the united and harmonious action of the various classes of people, has been long since reduced by the Hindus, to well ordered rules deduced from the unchanging facts of Nature. Hindu Social science is perfect as a system, any interference with it involving the reconstruction of the whole. It is built on a long observance of natural laws, and on a careful utilization of those laws for securing general content and the greatest happiness of the greatest number. The Hindus have, in fact, solved the great social problem ages ago; and any introduction among them of our (Englishmen's) crude ideas can only result in mischief, and tend to bring the Hindus into the same chaotic scramble of antagonistic interests, which is the characteristic of our own disgraceful social muddle.'

These and such other honest and favourable remarks on our customs have exasperated the Pioneer to a degree of ridiculous and impertinent sophistry The criticism is worth notice:—

'For the Englishman—even a "self-made" Englishman— to defend the Hindu system by arguing that it cultivates finer examples of woman-hood than that of his own country, is one of the most extraordinary instances we have ever met with of the Briton's inability to see what is at his side. Perhaps we may appear to take Mr. Pincott too seriously, but it is a pity to find a magazine like the *National Review* lending itself to the propagation of such silly calumnies on the women of England.'

---

Here is a picture rather a true but overdrawn one of the Hindu ladies of the conservative type.

"They have enough of occupations to purify and spiritualize their hearts and unlike European ladies they have very little chance of going astray by attending balls and other merry parties. The entire mind of a Hindu Lady is engaged in ministering to the happiness of her husband, children and relations and she learns all the virtues which adorn an angel. As a matter of fact a Hindu lady is an emblem of all that is good and pure and as such she is the ministering angel of her husband and not his tormentor like her sisters in Europe."

---

## वऱ्हाड.

येथील ब्यांकेचे एजंट मि. एटकीन हे सहा महिन्यांच्या रजेवर विलायतेस गेल्यामुळें त्यांच्या ऐवजी म्युनिसिपालिटींतील सभासदाच्या स्थानीं मि. हरतुमजी फर्दूनजी आसि. कमिशनर यांस सरकार मार्फत नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. दामोदर नानाजी अकोला स्माल काज कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट हे एका महिन्याच्या हक्काच्या रजेवर मुंबईकडे गेले आहेत.

रा. रा. बसितसिंग दुनियासिंह चव्हाण बी. ए. बडोदा लष्करचे कप्तान हे महिनाभराच्या रजेंत वऱ्हाडांतील आपल्या आप्त मित्रांस भेटण्या साठीं इकडे आले आहेत. सदर्हू गृहस्थ घरंदाज व विद्वान असून त्यांनीं बडोद्याकडे फार लौकर भरारी मारली तरी ते तिकडे चांगल्या मानमान्यतेस चढले असून बडोदे सरकारच्या मर्जीतले आहेत हें कळविण्यास आह्मास मोठा संतोष वाटतो.

प्रमोदसिंधू वरून कळतें कीं वणी, दारव्हा, यवतमाळ व मंगरूळपीर या ठिकाणीं पृथक पगारी सबरजिस्ट्रारच्या नेमणुका होणार आहेत.

## वर्तमानसार.

बाबू कुंद्र प्रसाद मिस्त्रा या नांवच्या बंगाल्यांतील ज्योतिषानें सन१८९१ सालचें वर्षफळ सांगितलें आहे तें येणें प्रमाणें :—

१ हे वर्ष दीडवर्षाच्या मुदतींत लिबरल पक्षाचा विजय होऊन ते लोक राज्यसूत्र हातीं घेतील.

२ काळ्या डोंगरावरील लढाईत इंग्रजी फौजेस पूर्ण यश प्राप्त होणार नाहीं. पुष्कळ रक्तपात झाल्यावर इंग्रज सरकार त्या पहाडी लोकांशीं तहनामा करतील. आणि हा प्रकार मिरनवाईच्या मोहिमेंत घडून येईल.

३ तीन महिन्यांच्या अवकाशांत मणिपूर संस्थान ब्रिटिश सरकार आपल्या कबज्यांत घेतील.

४ रूसदेश, फ्रान्स, जर्मनी, अफगाणिस्थान, चीन व जपान या राष्ट्रांत लढाई उद्भवेल आणि त्यापैकीं कित्येकांत इंग्लिश सरकारचें अंग राहील.

५ लार्ड लान्सडाऊन बहुतेक येत्या आक्टोबरांत स्वगृहीं परत जातील. त्यांचे मागून येणारे लाट साहेब लोकांस नावडते होणार नाहींत. त्यांच्या हातून देशाचें कांहीं कल्याण होईल. त्यांचा बांधा भव्य असून, विशाळ भाळ आहे. डोळे पाणीदार असून त्यांस दाढी लांब असावी. ते हुशार व शहाणे मुत्सद्दी असावेत. त्यांच्या वयाचें मान पंचेचाळीस पासून पन्नास पर्यंत असावें.

६ संमतो विलाचा कायदा लोकांची ओरड असून ही रद्द होणार नाहीं.

७ हाऊस आफ कामन्सचा अफू संबंधानें ठराव पसंत होऊन त्याची अंमलबजावणी होईल.

८ वायव्ये कडील मुलुखांत व त्यांत मुख्यत्वेंकरून दिल्ली, लाहोर, फरक्काबाद व रजपुतान्यांतील अजमीर शहरीं धरणी कंपानें नाश होईल.

९ मुंबई, मद्रास, ओरिसा, सिल्हट, मिथनेसिंग व बंगालच्या इतर ठिकाणीं दुष्काळ पडेल.

१० यंदा वर्षाऋतु मागील सालाप्रमाणें च होईल व चितगांग कडे मोठे पूर येतील.

११ इ. बी. एन. बी. आणि इ. आय. रेलवेवर अपघात होऊन प्राण हानि होईल; त्यांत खालील स्थळीं विशेष करून:— किसनगंज, चौढानग, डमडम मलान्की, परबतीपूर, सुलतानपूर, असोनसोल आणि बरद्वान.

१२ सार्वजनिक आरोग्यास धक्का पोंचेल. भयंकर दुःखण्याच्या साथी सुरू होऊन पुष्कळ लोक मृत्युमुखी पडतील. त्यांतील मुख्य भाग जेसोरी जिल्ह्यावर आढळेल.

१३ यंदा वादळ व तुफान उद्भवून जीवित्व व मालमत्ता यांचा नाश होईल आणि हा प्रकार बंगाल्या कडे होणार असून त्यांतल्या त्यांत उत्तर कडील मुलुखास फार भीती आहे.

हिंदुस्थानांत म्यांचेस्टरचे व्यापारी येऊन गिरण्या घालणार अशी बातमी उठली आहे ती कितपत खरी आहे हें एक परमेश्वर जाणे "पिकल्याशिवाय विकत नाहीं" अशी एक म्हण आहे, व म्यांचेस्टर आणि त्यांकाशायर येथील व्यापार आगीकडे पुष्कळ नसत चालला आहे, कित्येक गिरण्या अजीबंद झाल्या आहेत व कित्येक अगदी थोड्या तास चालतात अशी बातमी टाइम्स आफ इंडियाचे विलायतच्या व्यापारी बातमीदारानें त्या पत्रास कळविली होती तीवरून ती बातमी केवळ निराधार असेल असें म्हणवत नाहीं. शु. सू.

एरंडेल तेलाप्रमाणें सुखकारी रेचक दुसरें कोणतेंच नाहीं. तें घेण्यास किळसवाणें आहे या करितां जेवढें तेल द्यावयाचें तें त्यांच्या चौपट ऊन केलेल्या दुधांत बाटलींत घालून मिळवून द्यावें म्हणजे मुलेंसुद्धां तें नकळत घेतात. (ब्रिस्टल मेडि० जर्नल.) कु. रि.

पावशेर गव्हाचा कोंडा दोनशेर पाण्यांत घालून तो चांगला उकळावा व त्या गरम पाण्यानें मळकेलीं मोत्यें चोळून धुवावीं नंतर शेवटी स्वच्छ पाण्यानें धुवून घ्यावीं म्हणजे तीं साफ होतात. हु.

दोन वर्षांपूर्वीं हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरी कडून एका शास्त्रीय युरोपियन गृहस्थास हिंदुस्थानच्या शेतकीची तपासणी करण्या करितां पाठविण्यांत आलें होतें या युरोपियनाचे नांव डा व्होलककर आहे. यांनीं हिंदुस्थानांतील शेतकी संबंधानें शास्त्रीय रीत्या असा अभिप्राय दिला आहे की, शेतकी करण्याची जी रीत आहे ती फार उत्तम असून त्यांत सुधारणा करण्यास कोठेंही जागा नाहीं. 'हिंदुस्थानांतील शेतकरी रानटी आहेत व त्यांस शास्त्रीय शेती करणें मुळींच माहिती नाहीं. असें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें मी अगदी फेंकून देतो असें वरील शास्त्रवेत्त्यानें म्हटलें आहे. "हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांचा नांगर त्यांच्या शेतीस अत्युत्तम असून त्यांची नांगरण्याची रीत ही अगदी बरोबर आहे" असेंही हाच शास्त्रवेत्ता म्हणतो. सदरहू शास्त्रवेत्त्यानें आम्हा पतित झालेल्या सर्व सर्वच लोक ज्यांस तुच्छ मानीत आहेत इतकेंच नाहीं तर कित्येक नेटीव प्रोफेसर ज्यांस "रानटी, मुर्ख" अशी उपपदें देत आहेत त्या नेटीवांबद्दल अशा तऱ्हेनें निःपक्षपाती अभिप्राय दिला या बद्दल आम्हीं त्यांचे आभारच मानले पाहिजेत. हिंदुस्थानांतील शेती वाईट व ती सुधारण्यास विलायतचे लोक आणले पाहिजेत असें ठरवून घेण्यासाठीं कदाचित स्टेट सेक्रेटरींची ही योजना असेल तर ते चांगलेच तोंडघशी पडले यांत कांहीं संशय नाहीं. हिंदुस्थानच्या शेतकीस कांहीं सुधारणा नको आहे तर त्यास लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा नाहींसा करून आपल्या जातभाईचे खिसे भरण्याचा प्रकार चालू आहे तो बंद केला म्हणजे शेती सुधारलीच; पण आमच्या सरकारचें सर्वच उलट. पोटांत दुखत असलें तर डोक्यावर सुंठ थापण्याप्रमाणें असल्यामुळें आमच्या शेतीशी काय पण कोणत्याही गोष्टीत कांहीं सुधारणा व्हावयाची नाहीं.

अफगाणिस्थानांतील नद्यांत हिरे सांपडतील अनुमान करून त्यासंबंधानें तिकडे कित्येक असें युरोपियन कंपन्या गेल्या आहेत.

चीन देशामध्यें वाळण्याचें पांढऱ्या वेलाचें एक झाड सापडलें आहे. ठा. अ.

उपयुक्त माहिती—अंगाला लावण्याचें मिश्रण—लहान मुलांला न्हाऊं घालतांना पुढें लिहिलेल्या मिश्रणाचा उपयोग करावा म्हणजे मुलाचें आंग मृदु राहून खरूज वगैरे होत नाहीं आणि शरीराचा वर्णही चांगला होतो. गंधकाचें फूल मिळतें तें घेऊन थोड्याशा दुधांत घालावें व तें तसेंच तास दोन तास राहूं द्यावें. मग गंधक तळीं बसतो तो नहाणवितां वरचें दूध ओतून घेऊन मुलाच्या आंगास चोळावें. हें मिश्रण संध्याकाळीं ताज्या दुधांत करावें, व दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याचा उपयोग करावा. फार दिवस ठेविलें असतां नासतें. अदपाव दूध प्रत्येक खेपेस पुरे होईल. थोरांना व ज्यांच्या अंगावर खरूज वगैरे असेल, त्यांणीं सुद्धां याचा उपयोग केल्यास अंग स्वच्छ होऊन मऊ होईल.

अडीच तोळे टाकण खार व १। तोळा कापूर यांची चांगली बारिक पूड करावी व ती एक शेर पाण्यांत विरूं द्यावी. व तें थंड झाल्यावर त्याचा उपयोग करावा. त्यानें केस भिजवावे; त्याच्या योगानें केश स्वच्छ, सुंदर व बळकट होतात; आणि डोक्याला टक्कल लवकर पडतें तें पडत नाहीं. कापूर विरल्या नंतर व तें थंड झाल्यावर कापराच्या गोळ्या बनतात, तरी पण जें पाणी राहील, त्याचा उपयोग करावयाचा.

रेशमी रुमाल भिजवून एकेरा तोंडावर बांधिला असतां धुराच्या योगानें बिलकुल त्रास होत नाहीं. घुसमडावयास होत नाहीं; धुरापासून फुप्फुसांला मुळीं त्रास पोंचत नाहीं. आग विझविण्याच्या कामीं या युक्तीचा चांगलाच उपयोग होईल. कर०

प्रसंग पडेल तेव्हां कर्जाऊ पैसा काढतां यावा म्हणून काबूलचा अमीर कलकत्याच्या एका युरोपियन कंपनीशीं सांटें गांठें करीत आहे. या संबंधी बोलणीं करण्याकरितां सदरहू कंपनीचे दोन मुखत्यार अमिरानें काबुलांत बलाविले आहेत असें समजतें.

डांक लुटली— गोंडळ येथून राजकोटास जात असलेली डांक गेल्या आठवड्यांत लुटली गेली होती; परंतु मागाहून ती सांपडली. चोरट्यांच्या दांडक्यानीं ठेंचलेला स्वार हल्लीं गोंडळच्या दवाखान्यांत आहे.

हर्षवायू—सिकंद्राबादच्या दवाखान्यांतील आस्पिटल असि० ची प्रमी रोगास पास होणारी डिपार्टमेंटल परीक्षा झाली; त्याचा त्याला अतिशय आनंद होऊन त्याचें डोकें फिरलें आणि तो हल्लीं वेडा होऊन मद्रासच्या वेड्यांच्या आस्पिटलांत गेला आहे. स. शो.

मुंबईचे प्रसिद्ध म्युनिसिपल कमिशनर मि. रघुनाथ नारायण खोटे सी. आय, ई हे मे. ल्याच्या मागील शनिवारीं मुंबईस मरण पावले. यांणी म्युनिसिपल कमिशनरचें काम फार चांगलें केलेलें आहे. हे १८८३ सालीं मुंबईच्या म्युनिसिपालिटीचे प्रसिडेंट होते. १८७७ च्या दिल्लीच्या दरबारांत यांस मोठा मान मिळाला होता. मरणानें मुंबईतील एक चांगला गृहस्थ गेला असें म्हणतात.

हैद्राबादचे रेव्हिन्यु सेक्रेटरी नवाब व्हिकार उलमुल्क यांचे चिरंजीव मि. महमद अहमद यांनीं गेल्या १८व्या तारखेस विलायतेस सरे येथील रहाणाऱ्या मिस. चार्लेटी नांवाच्या एका वधूशी शादी लावली सदरहू गृहस्थ विलायतेंत कायद्याचा अभ्यास करण्याकरितां ६ वर्षे राहून त्या परिक्षेंत ते गेल्या नोवेंबर महिन्यांत पास झाले आहेत.

डा. अ.

बामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखावला लागणें, सूज येणें वगैरे सर्व सांधेगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशाच्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषध नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. यानें सर्व शरिरांतील चेतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकेंद्र (मेंदु) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला म्हणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळ[illegible]

आमचा पत्ता—नव्या ठाक[illegible] [illegible]

[illegible] दार समीर

---

[illegible] हें पत्र [illegible] डेराव [illegible] अकोला येथें के० वा० खं. [illegible]ळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा अगाऊ रु० ५ डाक हाशील ०।१२
सहामाही ॥ ३ ॥ ०८
सालअखेर ॥ ७ ॥ १०८
किरकोळ अंकास.................................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

Per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy.................................1as

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4as
Repetition per line3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXV AKOLA MONDAY 18 MAY 1891 NO 19

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख १८ माहे मे सन १८९१ इ० अंक १९



## HEALTH WEALTH &PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या व पुतळ्या.

खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा. खोटा माल घेऊन फसूं नका.



### ५०००० वर विकल्या.

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युता रक्ताचें जीव आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगावर करितात. ज्याच्या ... नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे व ... पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत. पात्रिपर्यो हजार ... साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा डब्यापासून बरे होतात. संधिवायु, शिरांगत वायु, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, भोंवळ, पुरुषत्व मंद, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांजवळ असावी हें योग्य आहे. ही डबी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर चितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु. ३ व पुतळीस रु. ९, सोन्याचे आंगठीस रु० २० व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक नग जास्त मिळेल. एक पासून सहा नग पर्यंत ट० हा० सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्हा० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती पत्रका करितां अर्धा आणा पाठवावा.

विकत मिळण्याचा पत्ता:—जी. बी. नाईक आणि कंपनी, भायखळा—मुंबई, बुधवारपेठ—पुणें

लोहभस्म केशर मिश्र व पुष्कळ वनस्पती मिश्रित

## बलभीम पाक

एकदम १०० तोळे पाक घेणारास १। रु. ची विजेची पुतळी फुकट मिळेल.

शिफारसपत्र—आपल्याकडून मागविलेला बलभीम पाक मी माझ्या सख्यास दिला. त्याची पांडुरोगासारखी भावना होऊन दिवसेंदिवस शरीर प्रकृति तेजहीन आणि क्षय होत चालली होती, ती आपल्या पाक सेवनानें बरीच सुधारली. पुनः ८० तोळे पाक जरूर पाठवावा.
रघुनाथ अनंत जमादार गद्दा रे० स्टेशन.

हा पाक लोकांच्या अनुभवास आलेला व थोर लोकांनीं पसंत केलेला व खाण्याला गोड असून (५१६ जिल्ह्यांतील लोकांस गुण आला आहे.) याच्या सेवनानें पुढें लिहिलेले गुण मनुष्याला प्राप्त होतात. नपुंसकत्वा सारखी नेबळाई नाहींशी होते. आंगावर चांगली कांती येते. शरीर पुष्ट होतें. धातु वाढते. स्वप्नावस्था व लघवींतून धातु जाण्याची बंद होते. योग्य वेळीं धातु लवकर पतन होत नाहीं. कामेच्छा वाढते. शक्ति येते. भूक चांगली लागते. शौचाला साफ होतें. डोळ्यांस थंडावा येऊन दृष्टि तीव्र होते. परम्याचा जुनाट रोग जातो. पित्त, आम्लपित्त, दमा, हगवण, आंव हे विकार जातात. स्त्रिया, पुरुष व मुलें यांनीं हा पाक घेण्यास फारच नामी आहे. कितीही तोळ्यांचे ३ डबे घेणारास त्या मासल्याचा एकडबा बक्षीस देऊं. दर २० तोळ्यांच्या ड. २॥ रु०, ४० तो० ड० ४॥। रु०, ८० तो० ड० ८ रु०, १०० तोळ्यांच्या डब्यास १९॥ रु०, टपाल व बंगखर्च निराळा पडेल

शिफारसपत्र—आह्मी तिघा मित्रांनीं मिळून आपला बलभीम पाक २७० तोळे घेतला आणि त्याप्रमाणें भावा तसा गुणही आला आह्मी चांगल्या मार्गी पैशाचा व्यय केला त्याबद्दल आनंद होत आहे. पाक गुणकारी आहे यांत शंका नाहीं.
हणमंत कल्याणराव, हणमंत लक्ष्मण बि० व रायचंद्र व्यंकटेश भिडोकार०

पत्ता— लक्ष्मण आप्पाजी परंतु धारवाडवृत्त ऑफीस, मु० धारवाड.


## SHEAGAON MUNICIPALITY LATRINE CESS RULES.

Rules for providing for the performance by Municipal agency of the duties generally performed by sweepers under section 98 of the Berar Municipal Law of 1886 and levying seavenging tax under section 42 of the said law in Town Sheagaon.

(I) *Municipal area to be divided into circles*— The area within the Municipal limits shall, for the purposes of these rules, be divided into such circles as the Committee may from time to time consider desirable.

(II) *Municipal peon to be appointed to each circle*— Each circle shall be placed in charge of a Municipal Peon, whose duty it will be to see that private latrines are duly cleared.

(III) *Definition of private latrine*—A private latrine is a place in a private house or shop used as a necessary.

*Explanation* I Where two necessaries are made in one house for the convenience respectively of the men & women of the family, they shall be considered one latrine.

*Explanation* II Where there are more latrines than one used by several separate families living in one building each such latrine shall be licensed.

(IV) *Latrine to be cleaned under orders of Municipality*— The cleaning & regulation of all private latrines shall be carried out under the orders of the Municipal Committee. For this purpose the Committee shall engage a sufficient staff of sweepers, but house-holders may if they prefer it, employ their own sweepers,

Provided that no Municipal sweeper shall be privately engaged to work for any person.

(V) *Latrine to be cleaned in the morning*— Each private latrine shall be cleaned once every morning.

(VI) *Extra charge for cleaning latrines twice a day*— Persons wishing their latrines cleaned morning and evening shall pay one and a half times the ordinary rate prescribed in rule IX.

(VII) *Special arrangements may be made for latrines at cotton factories.&c* The Committee may make special arrangements with cotton factories and European residents for the cleaning of their latrines.

(VIII) *Latrine license required*— Every owner of an existing private latrine in use and every person wishing to construct a new private latrine, shall provide himself with a latrine license.

*Explanation* An owner in this rule means the occupant or occupants of a house in which the latrine is situated. When there are more occupants than one using the same latrine, the application may be made in their joint names. But each occupant shall be held jointly responsible for breaches of the latrine rules whether his name appears in the application or not.

(IX) *Rates of license for latrines cleaned by publis sweepers*— The license fee for each latrine cleaned by Municipal sweepers shall be as follows:

| | per annum Rs. | as. | P. |
|---|---|---|---|
| Owners whose annual income does not exceed Rs. 100 ... ... .. | 1 | 8 | 0 |
| owners whose annual income is above Rs. 100 and under Rs. 500 ...... | 3 | 0 | 0 |
| owners whose annual income is above Rs. 500... | 6 | 0 | 0 |

In rating the cess the Municipal Committee shall, whenever practicable, be guided by the figures of the Town Fund assessment, which, for the purpose of these rules shall be accepted as conclusive proof of the income of applications.

*Note*— When there are two or more occupants using one latrine the joint income of the occupants shall be taken in calculating the rate to be imposed.

[X] *Rate of license for latrines cleaned by private sweepers*— Persons employing private sweepers under the provision of rule IV shall pay in advance a fee of Rs. 1-8 per annum towards the cost of night soil carts.

(XI) *Rate to be paid in advance*— The private latrine cess shall be paid in advance yearly or half yearly, at option of the license holder (unless a license is taken out intermediately), on the 1st April and 1st October.

(XII) *Condition under which license is valid*— No latrine license shall be valid save for the period for which payment has been made in advance and the period of every license shall expire on the 31st March or 30th September.

(XIII) *Hours of issuing license*— License shall be issued under the signature of the Vice Chairman on application at the Municipal office between the hours of 11 a. m. and 4.p. m. on all days except sundays & public holidays.

(XIV) *Application have to be made*— Each applicant for a latrine license shall fill in an application in the form A. annexed, paying at the same time the license fee if he be unable to write the form shall be filled in for him without charge at the office of issue, and he will be required to sign it.

(XV) *Form of license* The issuing officer shall then grant a license in the form B annexed.

(XVI) *Loss of licenee how to be supplied*— Licenses shall be produced on demand from any person authorized by the Committee on their behalf.

If the holder of a latrine license lose the license during the period of its currency, he shall be entitled to receive a duplicate license on payment of a fee of two annas and such duplicate shall have the same effect as the original license.

(XVII) *Owner responsible for sanction required for erection of new latrines* — No new latrine shall be erected until the plan and position have been approved by the Sanitary Inspector or such other officer as the Municipal Committee may from time to time appoint.

[XVIII] *Latrine to be supplied with suitable receptacles*— Each latrine shall be furnished with a galvanised iron pan, or such other receptacle as may be approved by the Committee for the retention of excreta. The Committee will provide these articles at cost price.

E. C. Rich
Chairman
Sheagaon Municipality.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध १० शके १८१३

वऱ्हाडांत देशी व्यापारी लोकांची स्वतंत्र सभा आहे काय असा प्रश्न आम्हांस एका सभ्य गृहस्थानें विचारला आहे आणि तशी सभा नसल्यास व्यापारी मंडळीस एकत्र जमवून त्यास असल्या सभेची आवश्यकता कळवावी आणि त्याच्या करवीं एक निराळी सभा स्थापित करावी असें ही त्यानीं सुचविलें आहे. वरील गृहस्थांचा आमच्या व्यापारी लोकांस परीचय करून देण्याचा तूर्त आमचा विचार नाहीं तरी आपणास त्यांच्या सूचने विषयीं अगत्यपूर्वक विचार केला पाहिजे. वऱ्हाड प्रांत सुपीक असल्या कारणानें येथील व्यापार फार जंगी आहे आणि ही सर्व लक्षावधी रुपयांची खरेदी विलायतेसाठी होत असून ही वऱ्हाडांतील व्यापाऱ्यांची प्रत्यक्ष विलायतेच्या सौदागीर मंडळ्यांशीं काडीमात्र संबंध नसतो इतकेंच नव्हें तर मध्यंतरी ह्मणजे माल शेतांतून निघल्या पासून तो विलायतेस पोंचे पर्यंत मधल्या देवघेवी पुष्कळ होतात तरी त्यांत आपल्या लोकांस किरकोळ किरकोळ बाबी शिवाय बिलकुल फायदा होत नसून सर्व किफायत युरोपियन व्यापाऱ्यांच्या हिंदुस्थानांतील मंडळ्यांस होत आहे. या वस्तुस्थितीचा खेद मानत बसण्या पुर्वीं सर्व देशी व्यापाऱ्यांच्या रात्रंदिवस ही गोष्ट मनांत बाणली पाहिजेशी. हिंदुस्थानचा माल खरेदी करून परद्वीपस्थ व्यापारी विलायतेशीं प्रचंड व्यापार चालवितात तो आपल्या हस्तगत करून घेतल्या वाचून आपल्या राष्ट्रोन्नतीस अन्य मार्ग उरला नाहीं. नाहींतर आपल्याच जीवावर दुसऱ्यांनीं खुशाल मौजा माराव्या आणि आपण घोर दारिद्र्यांत लोळत पडावें असें आपल्या नशिबी ब्रह्मदेवास कायमचे खोदावें लागेल.

व्यापारी सभे संबंधानें मुख्य कर्तव्य हेंच आहे कीं आपला व्यापार आपण करावा. आमच्या देशांतला व्यापार जवळ जवळ दोनतृतीअंश इंग्रजाकडे गेला आहे. व्यापारी सभांनी आपले हक्क राखावेत, बाहेर काय होतें आहे हें पाहावें आणि इंग्रजी व्यापाऱ्यांची तऱ्हा कशी, त्यांची हिम्मत केवढी, ती येण्यास साधनें काय वगैरे कळून संभूय समुत्थानाची पुनःसुरुवात व्हावी असें इच्छा करावेत अगर धोरकपांत म्हणावयाचें म्हणजे स्थानिक स्वराज्यानें जसा एक प्रकारें शिक्षण मिळावयाचा उद्योग हल्लीं चालू आहे तसाच व्यापारी सभे पासून संभूयसमुत्थान म्हणजे Joint stock company ची मूलतत्वें शिकावयाचीं, आणि व्यक्तिमात्र शक्तीचा संघांत मिसळ होईल असें धोरण ठेवावयाचें कारण प्रस्तुतचा मनुष्यव्यक्तिमात्राचा नव्हे आहे. संघांत सर्व शक्ती उरली आहे. आणि जागे सध्यांच आम्हीं नाहीं जाहलो तर पुढें निवांतपणें उठण्याची बिलकुल आशा नाहीं असें पहा इंग्रज व्यापारी आमच्या देशांत फैलावले आहेत त्यांची मुळें दिवसें दिवस खोल खोल जाता होत. व्यक्तिपरत्वानें त्यांच्यापाशीं सामना करणें केवळ दुसाध्य. संघच हवा पण तो तयार होई तों परियंत वाट पाहणें म्हणजे नदी इकून त्यानंतर पलीकडे जाईन म्हणण्या सारखें आहे. इंग्रजी व्यापाऱ्यांची मुळें खोल शिरली कीं आह्मीं मात्र मग ठार मेलोंच. आम्हाला दारिद्र्यांतून कधींच वर डोकें काढतां यावयाचें नाहीं. मूढजन Masses राष्ट्राची शक्ती तो इंग्रज व्यापाऱ्यां कडे जाऊं देतां कामानये. शिकलेसवरलेले शांतता प्रियते मुळें गाढवाच्या पेटीतील नागा प्रमाणें दांत पाडून घेत डुलत बसणार; बडे कामदार सा. आय. ई. गोंडा घोळणार आणि Masses इंग्रज व्यापाऱ्यांच्या हातांत पडणार आणि असें जाहलें म्हणजे North American Indian सारखे आम्ही Black Indian बनून होऊं. आपल्या देशांत माणशी व्यापार आम्हां लोकांच्या हातीं अवघा तीन रुपयांचा आहे. इंग्लंडवाले २५० चा करितात. गेल्या सालीं फक्त मुंबई बंदरांतून १४ लक्ष ८० हजार कापसाचे गठ्ठे विलायतेस गेले त्या त्या पैकी अवघे ३४ हजार आम्हा लोकांनीं पाठविले. हिंदुस्थान चा व्यापार आपल्या हातीं घेऊन दरसाल कमीत कमी १९ कोटी रुपयांचा कमाई इंग्रज व्यापारी करितात अशा अनेक गोष्टी बहुत सांगण्या जोग्या आहेत पण त्यांची तूर्त पुस्तवात आवश्यकता नको आहे. फक्त आपला वऱ्हाड प्रांतच पाहू. "The Inland trade of India during the year 88-90" हें बुक पाहिलें म्हणजे आढळून येईल कीं ३७० लाखाचा माल मुंबईस-हलखा आणि बंदर--गेला आणि मुंबइहून १०५ लाखाचा वऱ्हाडांत आला म्हणजे हा पांच कोटीचा व्यापार सर्व वऱ्हाडकर मंडळीच्या हातीं नाहीं. पराकाष्ठा कोटीची घडामोड आमच्या मंडळीच्या हातून होत असेल राली ब्रदर्स सारख्या कंपन्या निदान २०।२२ लाखाचा फायदा निव्वळ बेपरवाईनें मिळवितात. आमच्या लोकांत भांडवल आहे, शहाणपण आहे धाडस आहे. स्वंग ईमानी नौकर आहेत मग तो कां आमच्या हाती राहूनये? याचें कारण संयुक्त धाडस, संयुक्त भांडवल आणि संयुक्त महत्वाकांक्षा नाहीं हें होय. असल्यापासून फार अहे यास्तव ठिकठिकाणीं व्यापारसभा स्थापून त्यांच्या पुढें उद्योगाच्या नवीन नवीन दिशेचें पारायण केलें पाहिजे. आंकड्याची माहिती द्यावी आणि संघ तयार करावा आणि एवढें काम होईल तर पडत्या राष्ट्राला एक खांब मिळेल आज मुळ जन्मले एवढेंच. त्याची जोपासना केली पाहिजे. दुखण्या बाण्यांतून वाचविलें पाहिजे. इत्यादि सर्व प्रकार आज आम्ही मुद्दाम व्यापारी मंडळीस सांगत आहों.

---

इंग्रज सरकारास परधर्मी व परदेशी प्रजेस वागविणें मोठें कठीण आहे. त्यांच्या राज्याच्या स्वस्थते साठी त्यांस दंग्याचा बंदोबस्त चिरकाळ फार कडकरितीनें केला पाहिजे. लोकांस रात्रंदिवस दहशत असावी लागते कीं सरकारच्या कायदे कानू विरुद्ध वर्तन घडल्यास फार भयंकर प्रकारानें त्याचें प्रायश्चित घ्यावें लागेल. ह्या सर्व गोष्टी आम्हास नाकबूल नाहींत तरी सरकारनें हें ही लक्षांत वागविलें पाहिजे कीं प्रजा म्हणजे कांहीं जनावरें नाहींत. त्यांस मनोविकार सर्व प्रकारचे असतात संमती विरुद्ध सर्व बेताबाजी हेंवाल दिल झाला आहे अशा वेळीं काशी सारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं लोकांच्या मनाचा क्षोभ करून राममंदिर पाडण्याच्या खटपटीस मुनासिपालिटीनें लागावयाचें यांत केवढा अपराध घडत आहे अशा बद्दल सरकारांतून यत्किंचित् तरी विचारणी झाली आहे असें अजून लोकांस ठाऊक नाहीं. वारंती पाठी मागून घोडें या प्रमाणें राममंदिर कायम राखलें जाईल असा ठराव झाल्या पासून कांहीं एक उपयोग नाहीं. उलटें एका पक्षीं लोकांचा उपहास व अवहेलना करून त्यांच्या गोष्टी बिनतोड म्हणून कबूल करण्या जात आहेत. हा सर्व प्रकार खरा आहे तरी बंगेलोर या सदरा खालीं तीन न्यायाधीश नेमून दोघांहीं जणांची चौकशी चालली आहे यांत लष्करी धोरणा वर न्याय दिला जातो. हें फार फार वाईट. आमच्या मतें या दंग्याच्या अपराधाचें स्वरूप अगदीं सामान्य आहे. इंग्लंडांत अशा प्रकारच्या वर्तनास प्रसंगानुसार लोकमताच्या दाबाखाली खरा वेगळें कांहीं एक स्वरूप देणारे होत असा आमचा अनुभव आहे. हिंदुस्थानांत अशा प्रकरणीं न्याय थोडा कडक असला पाहिजे तरी ज्यांच्या कृतीमुळें लोकांचे मनाला या थराला येऊन पोंचला त्याबद्दल त्यांची ही चौकशी आतांच होणें आवश्यक आहे. ह्या दंग्या पासून सरकारनें हा एक गोष्ट शिकण्या सारखी आहे ती अशी कीं सामान्य कारणा निमित्त प्रजेचा विनाकारण छळ करून तिला अपराध करण्यास लावून नंतर त्या बदल शिक्षा ठोठावत बसण्याचा परिपाठ त्यांच्या राज्याला अपाय कारक आहे.

सध्यां निवळ दंग्याच्या वहिमा वरून बेलाशक पाहिजे त्यास पकडून चौकशी चालवितात. निरपराधी ठरल्यास मोकळा होतो नाहीं तर परिपत्य भोगण्या साठीं पुष्कळ जणास तुरुंगांत रवाना करीत आहेत मुख्य मुख्य दंगेखोरास पकडण्या साठी बक्षीसें ही लावण्यांत येत आहेत.

---

( आमच्या एका मित्रा कडून )

प्रसिद्ध तत्ववेत्ता बेकन--ज्यास तत्वज्ञानाचा जनक हो सज्ञासन्मान्य व विद्वान लोकां कडून मानण्यांत येते- हा मोठा व्यवहारचतुर व लोकाचार निष्णात होता असें त्याच्या भारदस्त ग्रंथा वरून व्यक्त होतें. तात्विकज्ञान व व्यवहारनिपुणता यांचा जगामध्यें क्वचितच मेळ घडतो असा जो अज्ञ व कोत्या विचाराचे लोकांचा समज त्याची अनृतता व उच्छृंखलता कांहीं अंशानें तरी भासविणारा बेकन हे मूर्तिमंत उदाहरण होय. त्याचे हे गुण नैसर्गिक होते किंवा आगंतुक होते हा प्रश्न निराळा आहे. इतिहास प्रमाण्या वरून ते दुसऱ्या वर्गांतच गणले जातात.

बेकन ह्याचा स्वभाव कांसेखोर होता; जन्म मधल्या स्थितींतला परंतु अपूर्व बुद्धिमत्तेचें तेज अंगी असल्या कारणानें श्रेष्ठ पदाची हाव सहजीं लागली व इतकें मोठें स्थित्यंतर करण्याचे कामीं निस्पृहता स्वावलंबन वगैरे गुण बहुशः निरुपयोगी झाले असते. वस्तुस्थिती व कालमान हीं हो त्यास हे गुण प्राप्त करून देण्या मध्यें बरीच कारणीभूत झालीं. जेम्स सारखा स्तुतिप्रिय स्वच्छंदाचारी राजा आपल्या एक कलमी अमलानें राज्यसूत्र चालवत असतां व वरिष्ठाच्या मुनतझा मर्जी संपादनाकर मोठ मोठी कामें उरकत असतां, वहाल्या गंगेत हात धुऊन घेणें बेकन सारख्या मनुष्यास साहजिक होते उच्च पदाची अनिवार आशा लागण्याला त्याचे अंतरस्थ सद्हेतु परक होते असी पुष्कळांची समजूत आहे. ते हेतु कोणते तर उपरुद्ध सृष्टिज्ञानाला भर घालून त्याचे पूर्ण आकलन थोड्या अवकाशांत व्हावें आणि प्रचलित शिक्षण संस्था मध्यें तत्कालीन ज्ञान व शिष्ययांचा अनुरूप फेर बदल करणें. व हे उद्दीष्ट नेण्या साठीं सामाज्ञा, द्रव्यानुकूलता, अधिकारापन्नता ह्या उपकरणांची अवश्यमेव जरूरी होती.

बेकननें एक निकळ निबंधाचें पुस्तक लिहिलें आहे. तें अर्थ प्रागल्भ्य, गंभीरता व मनुस्वभाव ज्ञान यांनीं ओतपोत भरलें आहे त्यांतील लहान लहान वाक्यें इतकी अर्थ भरित आहेत कीं त्यावर मोठ मोठाले निबंध लिहितां येतील त्यानें केलेले ग्रंथ विद्यांस व प्रसासस त्यांतील भाषा सरणी व शास्त्रांची व्यवस्थेशीर ठेवण व योजना यांची बरीच मदत झाली.

व्यवहार नैपुण्या बद्दल नें ह्मह्मी कांहीं ह्मटलें आहे त्याचा वाचकांनां प्रत्यक्ष अनुभव आणून देण्या करितां त्यांचीं कांहीं अमोल सर्वें देण्याचा आमचा इरादा आहे.

मनुष्यांनें आपली स्थिती सुधारून सुखी होण्या करितां कोण कोणत्या साधनांची योजना करावी ह्या विषयीं संक्षिप्त सूचना.

जगामध्यें जास्ती वापरलेल्याशीं ओळख व स्नेह दृढ असावा. धंद्याच्या वैचित्र्या नुरूप त्या मधील अतीशय वाकबगार व अनुभवी गृहस्थांशीं स्वार्थासाठीं सलगी व मैत्री जोडावी बोलण्यांत मितपणा किंवा सढळपणा मंडळी पाहूनच ठेवावा. मनमोकळा स्वभाव असला ह्मणजे लोक ही तसेंच वर्तन ठेवितात व त्या मुळें अधिक माहिती मिळण्यास जागा होते. आपलें गुढ एखाद्या जवळच सांगणें ह्मणजे विश्वास व स्नेह यांचें बीज पेरण्या सारखें आहे.

प्रत्येक मनुष्यानें आपल्या स्वाभाविक ( शारिरीक व मानसिक) शक्तीचा नीट अभ्यास घ्यावा व त्यांचा पोंच, धारणा इत्यादि विषयीं मनन करावें. आपल्या कर्तबगारीचे व गुणाचें निःपक्षपात दृष्टीनें अवलोकन करावें त्याच प्रमाणें अवगुणांचे हिशोब बरोबर ठेवावे; व ज्यांचें परिमाण आहे त्या पेक्षां जास्त कल्पून त्यांचें दुरीकरणा करितां विशेष तत्परता दाखवावी; आणि गुणांची अल्पता समजून त्यांत भर घालण्यास झटावें.

ह्या दोन सूचना मनात बांधल्या निश्चल्या नंतर खालीं दिलेल्या गोष्टींचा विचार व्हावा.

# The Berar Samachar

**MONDAY, MAY 18, 1891.**

When it was reported that there would be this year no Provincial Conference at Poona deep regret was expressed that such a useful institution for political purposes should be sacrificed. For although we may fight bitterly amongst ourselves for social matters, it was thought, we ought not to sacrifice and neglect political matters where the interest of all without a single exception is concentrated. But in a few days a gladdening news was announced that the Conference will hold its sittings for two days at Poona on the 11th and 12th of May. But when again it was learnt that the much discussed Age of Consent Act was to be brought before the Conference for its being protested against great anxiety was felt as to whether the harmony of the Conference would be broken. For this very reason the discussion of the subject — the recently passed Age of Consent Act— was reserved to the second day as the last item to be taken up by the Conference after the notified subjects had been discussed and thoroughly sifted and resolutions adopted thereon. The first day's proceedings went on quickly and the draft resolutions formed by the subject Committee were read, discussed and unanimously adopted. On the second day in the morning great pains were taken to secure harmony in the proceedings of the Conference for it was natural to expect serious division in the Conference when the subject of the Age of Consent Act would be brought before the Conference in the afternoon. After much discussion in the morning it was agreed in the Subject Committee to say this much with reference to that subject that the Conference places on record its regret that the Govt. of India paid no due regard to public opinion while passing the Age of Consent Act, thus clearly showing that the Govt. heeded not the opposition of the people, nor did it adopt even a single amendment suggested by those who supported the bill. This proposition as settled in the subject Committee was proposed in the Conference by Mr. Tilak who had opposed the bill and seconded by Mr. Lele who had supported it. Thus we see that the both the supporters of the bill and the oppositionists are dissatisfied with the action of the Govt of India while passing the bill. Thus the appalling difficulty being safely tided over which had appeared in the begining. The various other great resolutions formed by the subject Committee were read and adopted. We are re to see the Conference come to an end for that its end would be in complete harmony with its begining was not expected but on the contrary serious apprehension had been cherished that there would be a schism the Conference. But all is well that ends well.

But what are we to learn from the above fact? Though there may be serious differences of opinion amongst us with regard to social matters with regard to political matters we are in complete harmony with one another. We so proceeded with the work of the conference that we allowed not our private feelings disturbed by mutual attacks made both by the supporters of the bill upon the oppositionists and by the oppositionists upon the supporters, to come into play and seriously mar its harmony. Thus we have clearly shown by our present conduct to the Govt., to those who rejoiced when they saw us fighting so bitterly only a few days ago and to those who thought that unity again amongst ourselves was a thing impossible that though we may be at daggers' drawn with one another in social matters in political matters we walk hand in hand we have all of us one gaol and for the attainment of which we all with one heart, one mind and one accord, will strive hard.

The successful end of this conference has gone and will go a great way to allay and falsify the fear that was felt in various quarters that owing to the recent discussions over the Age of Consent Bill which have been productive of much acrimony and have embarked party feeling political matters and political institutions will not be attended to with that vigour and that enthusiasm which was witnessed in previous years and thus will come to be neglected. The Conference has thus set a very noble example of reunion to be follow ed by other provinces in similar junctures

## CORRESPONDENCE

To

The Editor Berar Samachar
Akola,

Sir,

Last week and the first half of the current week were very busy weeks. To begin with there was the annual elocution gathering commencing from the 3rd of May. It extended over 4 days. The number of candidates for the appointed subjects was 16 only — a very small number indeed. I do not know why there should be such a falling off in the number of the candidates presenting themselves at the gathering. This gathering was the 21st gathering and one would naturally expect the number to be on increase with each succeeding year but contrary is the case with each year in regard to the number of the candidates. Out of 16 who had given in the names only 13 were present at the occasion. But it must be said in justice to the candidates that most of them had come well prepared. The ast subject that is public opinion, how is it to be aroused in India? &c was very badly treated. R. B. Kashinath B. Mara the on behalf of the president R. B. G. H. Deshmukha in a short speech point ed out to the candidates the defects in their speeches and showed them the way in which the subjects ought to have been handled by the candidates.

Then came the annual Deccan College gathering. To say a few words about the gathering here will not be out of place due since now in Berar are to be found many a student of that College and consequently they must no doubt be anxious to read and learn a short account of the gathering which has a close connection with the College they are studying in. The object of the gathering is to get together the past & present students of the College with a view that they should meet together at one place once a year for a couple of days; make themselves acquainted with each other, the past students with the present and *mutatis mutandis*, discuss various subjects, dine together, play together, all standing on one level, and thus promote brotherly feeling in them. To provide such amusement for the members of the gathering the subscription which each member is called upon to pay is indeed little. A member, if student, is to pay a rupee a half and those whose incomes ranges above 30 Rs are to pay 2½. If we bear in mind the object of the gathering it seems but clear, that such an institution deserves to be supported and brought into a flourishing condition and not to be allowed to dwindle down into insignificance and thus by degrees to die a lingering death. This year I was present at the gathering and what struck me most was the falling off in the number of the members of the institution. The reason of this is not, I think, far to seek the apathy and negligence of the past and present students of the College. Excuse me sir, if I am harsh. Many of the past and present students of the College who were actually present here were absent at the gathering. I ask you sir, does this conduct become them? What I want to insist and point out strongly is that those who have at their heart the well being of the institution should henceforth try to attend the gathering and thus bring into play sympathy in lieu of apathy towards the institution. With these few remarks I give below in brief the account of this years gathering.

The gathering extended over two days the 9th and the 10th of May. The attendance on both the days was small— mostly of the College students now studying there. As for the past students of the College that were present there, the number was very small. On the 9th after swiming in the morning and dinner as usual, some took to playing, some to discussion and this went on up to 5 p. m. At five Proff. Selby who was requested to attend the gathering came in when R. B. C. N. Bhat read a paper on the Marriage laws of the Hindoos. Rao Bahadur dwelt on the fact that consummation of marriage could be postponed after puberty Proff. Selby in a very short speech observed that for National well-being the postponement of the consummation of marriage at an earlier age was undesirable and pointed out the evils arising therefrom as for instance the untimely rather motherhood, premature death of children, their weakness and the stunting of the growth of children. He further remarked how advantageous would it be for College students to finish their College course of study first before they enter on domestic duties but at present students are called upon to enter into worldly life long before they have finished their College course so that their course of study is seriously disturbed. On the second day as usual the course of the first day upto dinner was repeated. After meals the annual report was read. A new managing Committee was appointed for the year 1891 1892.

As for the prize styled "Purushottam Rao prize" the subject of which is the history of Hindu Social reform, I am sorry to say it remains this year uncompeted for since not even a single essay on the subject came to the Secretary & consequently the same prize was required to be left to be completed for next year.

Professor Selby being requested to attend the gathering this day also came in at 5. when Mr. B. G. Tilak delivered a very instructive lecture on the "antiquity of Vedas". He traced back the antiquity of vedas to 6000 B. C. by what is called the astronomical method. European scholars have traced back the antiquity of Vedas to 2000 B. C. Mr. Tilak quoted various texts from Rig-Veda and Brahmins as corroborative of what he said. The lecture will soon appear in the form of a pamphlet and will no doubt be read with extreme eagerness. His theory is quite a new one and appears to be sound. Mr. Tilak is indeed to be thanked and encouraged for the most searching manner in which he is now a days carrying on his study of ancient works which have called forth the admiration of the most educated and advanced nations of the West. After this Pansupari, Uttar, garlands were distributed and the gathering was dissolved.

Then came the Provincial Conference. It extended over two days. Its sittings were held in the afternoon. The session of the Conference was a complete success and I need not mention it in detail as the whole proceedings are well known through the columns of the cotemporary papers.

Another important event of the week was the celebration of a widow remarriage. Dr. R. G. Bhandarkar celebrated the remarriage of his daughter Shantabai with Raosaheb Gopal Vinayak Pandadikar, Dy. Educational Inspector Coloba at Khandala on Monday the 11th. Shantabai by a mysterious decree of fate, got her widow hood while she was fourteen. The intervening period she had very usefully employed that is to say in getting herself educated. Dr. Bhandarkar is a staunch adherent of widow remarriage question. So long we have been hearing that those who preach widow remarriage shrink from that very thing when it is their lot and when they have occasions to act up to what they preach. Here our Dr. has boldly and with good deal of moral courage come forward and proved that preaching and practice are not inconsistent in his own case. When such notabilities by their personal example set before the people a worthy precedent to be followed then and then only we can expect their preaching to bear fruit and strike root deep into the convictions of the people.

Indeed Dr. Bhandarkar has taught a very noble example. May it be followed in similar cases.

May the couple newly united live long and enjoy the sweets and pleasures of life.

Proff. Chatre's circus is proving a grand source of amusement to the public here very night. It is said he will shortly leave this place.

Poona 14th May 1891 } Yours "B"

## वऱ्हाड.

बुलढाण्याचे डेप्युटी कमिशनर कर्नल स्टानकी साहेब पंचवीस दिवसांच्या रजेवर जात असल्यामुळें त्या रजेंत येथून मे. यासीनखा साहेब यांस डेप्युटी कमिशनरच्या जागीं नेमिलें आहे ही आनंदाची गोष्ट होय.

येथें मेल्या आठवड्यांत रा. रा. परशुरामपंत सोवण यांच्या घरीं पांचशाताशें रुपया पर्यंत चोरी झाली तिच्या हकीकती वरून चोरीस एखादा घरभेद्या सामिल असावा. पोलीसांचा तपास नामर्दपणाचा असल्या मुळें चोरीचा सुगावा लागणें मुष्किलीचे आहे असें लोक बोलतात त्याकडे आमच्या पोलिस अधिकाऱ्यांनीं लक्ष पुरवावें.

मुंबई कर परांजपे नाटककार मंडळींनीं मृच्छकटिकाचा प्रयोग करून दाखविला. खेळ चांगला झाला त्यांत विशेषें करून वसंत सेना चारुदत्त वीट इत्यादिकांचीं कामें उत्तम वठलीं. आजरोजी रात्रीं संगीत सौभद्राचा खेळ करून मंडळी उमरावतीस जाणार आहे.

उमरावतीहून 'क्ष' सहीचा इंग्रजी पत्रव्यवहार उशीरा आल्या मुळें छापतां येतनाहीं ह्मणून दिलगिरी वाटते. क्ष ह्मणतात कीं उमरावतीस सेन्ससेचे आंकडे मांडणारे पाऊणशेंनिशे कारकुनांनीं आपलें काम सोडलें कांकीं सरकारांतून त्या गरीबबिचाऱ्यांस पगार मिळेना, जादा कामा निमित्त बक्षीसाविषयीं त्यांची निराशा झाली, वरिष्ट अधिकाऱ्यांस दया माया नाहीं, उन्हाच्या व भुकेच्या व्यथेनें उपासमारा होती—इत्यादी गोष्टी फार शोचनीय आहेत त्या दूर तत्काळ न झाल्यास दाद मागण्यासाठीं खुद्द सरकारपाशीं जाणें भाग आहे

## वर्तमानसार.

हिंदुस्थानचे कट्टेद्वेषी मि. म्याकलीन हे सुद्धा संमतिवयाचा कायदा पास झाल्यामुळें घाबरले आहेत त्यांनीं एक ठिकाणीं व्याख्यान देते वेळीं असें झटलें आहे कीं "हिंदुस्थानांतील तरुण मुलांच्या लग्नांत सरकारानें जो कायदा करून हात घातला तो घालते वेळीं त्या सरकारानें अतिशय घाई केली यांत कांहीं शंका नाहीं. वरगुती चालीरितींत हात घालण्यापासून तेथील लोक जितके असंतुष्ट होतील तितके दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें होणार नाहीं असें मी आपल्या अनुभवावरून सांगतों" हा कावा अजूनचा व्यापार बंद होऊं नये म्हणून होता.

मुंबई हायकोर्टाचा एक ठराव मेल्या गमतीचा व वकील लोकांस गुलाम बनविण्यासारखा प्रसिद्ध झाला आहे. त्या ठरावांतील थोडक्यांत गोषवारा असा कीं "जे उमेद्वार हायकोर्टाच्या वकीलीची परिक्षा पास होतील त्यास त्याच्या मर्जीप्रमाणें वकिली करण्याची सनद मिळेल पण जे साधीच वकिली पास होतील त्यास त्यांच्या मर्जीप्रमाणें वकिली करण्याचें ठिकाण न मिळतां हायकोर्ट सांगतील त्या ठिकाणीं त्यांनीं वकिली करावी." यांतील दुसऱ्या वाक्याचा स्पष्टार्थ काढूं लागल्यास वकील लोक हायकोर्टाचे ताबेदार आहेत असें होत नाहीं काय? विलायतेहून सिव्हिल सर्विस पास झालेल्या व आरण होऊन सरकारच्या दयेवर अवलंबून राहणाऱ्या लोकांसही इतकी जबरदस्त अट नाहीं. कित्येक कोर्टांत वकिलांची फार गर्दी झालेली असते व कित्येक ठिकाणीं वकील मुळीच मिळत नाहींत असा या ठरावाचा हेतू असावा अशी कल्पना आहे. ही खरी असेल तर खरी असण्याचा पुष्काळ संभव आहे, हायकोर्टासही उटल्या गावची पाटिलकी करण्याची कांहीं जरूरी नव्हती. वकील लोकांस जितकें स्वतःचें हित समजतें त्याहून हायकोर्टास त्यांचें हित कधीं समजलें हें सृष्टिनियमाप्रमाणें अगदीं खरें आहे.

खोरासनाच्या गव्हरनरास इराण सरकारानें काढून टाकिलें असून त्यास तेहेरान येथें समन्स काढून बोलावण्यांत आलें आहे.

आमच्या प्रांतांत तुह्मी तरी शांतता करा अशी चिनी सरकारानें इंग्लिश, फ्रान्स आणि अमेरिका यांस विनंति केली आहे व ती विनंती तिघांनीं कबूलही केली आहे असें ह्मणतात.

१८९२ च्या १२ एप्रिलपर्यंतच्या काळाचे बंगालच्या एका ज्योतिषानें पुढील प्रमाणें भविष्य केलें आहे:- चोऱ्या, रोग यांची सर्व देशांत विपुलता होईल बंगाल प्रांतात पूर येतील आणि दक्षिणेंत दुष्काळ पडेल अशक्ततेमुळें लार्ड ल्यान्सडौन हे राजीनामा देतील, राष्ट्रीय सभेचे हाल कुत्रा खाईनासे होईल संमतिवयाचा कायदा बंद केला जाईल अपराध्यांची संख्या इतकी वाढेल कीं, तुरुंगांत अतिशय गर्दी होईल, रशियाच्या गुप्त कारस्थानानें अफगाणाचा अमीर पेचांत येईल आणि हिंदुस्थान व अमेरिका या देशांत शारिरिक रोगानें पुष्काळ लोक मरतील.

यंदा अमेरिकेंत कापसाचें पीक चांगलें असें दिसून आल्यावरून त्याठिकाणीं कापसाचा दर उतरला आहे.

काश्मीर आणि गिलजित येथील सरकारी कामदारांस दारूगोळा हत्यारें वगैरे इतर ठिकाणीं पाठविण्याचा अधिकार आहे पण त्यांस तें सामान दुसऱ्याकडून आलेलें घेण्याचा अधिकार नाहीं असा नुकताच एक ठराव प्रसिद्ध झाला आहे.

लहान मुलांच्या पायांत रंगाचे पायमोजे घालूं नये त्यामुळें मुलांची प्रकृति बिघडते असें पारिसच्या एका सभेनें ठरविलें आहे

हरिद्वाराहून यात्रेकरू परत आल्यामुळें सिरसा आणि गुरगांव या ठिकाणीं थोडी पटकी उठली आहे.

मणिपुरास २००० सैन्य व सहा तोफा कायमच्या ठेवण्यांत येतील पटकी अतिशय उठली आहे. आणि त्यामुळें हल्लीची छावणी सोडणें भाग आहे. राजवाड्याची हवा वाईट असून पाणी मचूळ आहे.

सीलोनच्या चहास विलायतेस विलक्षण प्रकारची दर येऊं लागला आहे. लंडनची ता. ८ मेची तार सांगत कीं, ता. ७ रोजीं याचा दर दर पौंडास २५ पौं. १० शि. होता!

जुलसली आंडी नावाच्या एका गोऱ्या मनुष्यानें नोगांग येथील एलिस नेटीव बाईस ठार मारल्यामळें त्यास जन्मठेपकाळ्यापाण्याचा शिक्षा कायम झाला होती. सदर्हू मनुष्य तुरुंगांतून पळून गेला आहे असेंआतां बाहेर आलें आहे.

आम्हांस पार्लमेंटचे मेंबर निवडण्याचे अधिकार कां असूं नयेत याबद्दल विलायतच्या कित्येक नायका पार्लमेंटास अर्ज करणार आहेत असें म्हणतात.

इन्फ्लुएन्सा नावाचा ताप खुद्द लंडन शहरांत व आजूबाजूस फार जोरानें वाढतो आहे. ठा. अ.

—चिली येथील एक लढाऊ जहाज लढाईच्या सामुग्रीसह येथें आहे त्याच्या शोधार्थ अमेरिकेन सरकारानें आपलीं लढाऊ जहाजें पाठविलीं आहेत.

—चिलियन प्रधान मंडळांनां ठार मारण्याच्या उद्देशानें वालपरायझो येथें कांहीं लोकांनीं एक दारूचा गोळा टाकला.

विलायतेंतील डेली टेलिग्राफ नांवाच्या पत्राचे मालक एक नवीन छापण्याचें मशीन तयार करवीत आहेत. या मशिनवर १० फर्मे एकदम छापले जाऊन, प्रति निराळ्या कापल्या जाऊन, त्यांच्या घड्या पडून त्यांचीं निरनिराळीं पुडकीं होऊन तयार होतील या एका मशिनला १० लक्ष रुपये खर्च लागणार आहे. सु. प.

पुनर्विवाह.—गेल्या ११ वे खंडाळ्यास डा. रामकृष्णपंत भांडारकरांची गततृका कन्या शांताबाई हिचा, रा. सा. गोपाळ व्यंकटेश पानंदीकर, कुलाब्याचे डे. ए. इन्स्पे यांचे बरोबर विवाह झाला. त्या समारंभास येथील व मुंबईची बरीच मंडळी खंडाळ्यास गेला होता. ज्ञा० च०

शेतकऱ्यांचे ऋण मोचना साठीं म्हणून जो कायदा झालेला आहे, तो रद्द करण्याचें विचारांत सरकार आहे असें समजतें. ही बातमी मुंबईत मारवाडी सावकारांचा समाचार घेण्यासाठीं साहेब लोकांच्या चिथवणीनें जी मंडळी स्थापन झाली आहे, त्या मंडळीचे पुढारी मि० चेंबर्स यांच्या तोंडून परवां बाहेर पडली आहे तथापि त्यांत बराच खरेपणा असावा असें दिसतें.

लग्न मुंजींत व्यर्थ खर्च न होण्या करितां कोणी हा नायकिणी नाचवू नयेत. असा मुंबइतील कायस्थ लोकांत सन १८८७ सालांत जातीचा ठराव झालेला आहे ह्या ठरावाचें उल्लंघन रघुनाथ दामोदर नांवाच्या एका गृहस्थानें केलें म्हणून जातीनें सभा भरून ठरावाचें उल्लंघन केल्या बद्दल त्याला आमंत्रण करूं नये असा ठराव केला व त्याच्या प्रती जातींत प्रसिद्ध केल्या म्हणून सदर्हू रघुनाथ दामोदर यांणें जातील ४१५ असामीवर ५ हजार रु० नुकसानीचा दावा केला होता. त्याचा निकाल जस्टिस फारन यांणीं करून हें शुद्ध जातीचें प्रकरण आहे ह्यांत कोर्टाला हात घालण्याचा अधिकार नाहीं असा ठराव केला. हा ठराव फार महत्वाचा असून त्यांत पुष्कळ मुद्यांचें नाम० जज्जांनीं समर्पक निराकरण केलें आहे.

यंदांच्या राष्ट्रीय सभेस ६००० खुर्च्या व १००० खाटा पुरविण्याची टेंडरें मागण्यांत येणार आहेत.

नाशिक--रा. सा. पेंडसे दक्षिणभाग कमिशनरचे दप्तरदार यांचे कुटुंब भर रस्त्यांतून हळदी कुंकवास जात असतां सायंकाळीं ६ आणि ७ यांचे दरम्यान त्यांचे नाकांतील नथ चोरट्यानें काढून नेली! बोजर २१४ नायका व कंदीलवाला शिपाई होता तरी ही स्थिति! आतां मोंगलाईला कशाला हंसावें?

चोरमाकड—मुंबईत चापा गल्लींत चुनीलाल सखलचंद ह्मणून एक गृहस्थ राहातात. ते ४ दिवसां पूर्वीं आपला कोट तिसऱ्या मजल्यावर ठेऊन खालीं आले होते. त्या वेळांत एक माकड खिडकींतून आंत जाऊन त्यानें त्यांच्या खिशातील सोन्याचें घड्याळ व सांखळी आणि एक पाकीट पळविलें. चुनीलाल वर गेलें आणि पाहातात तों माकड हें सामान घेऊन खिडकींत बसलें आहे त्यानें जिनसा टाकून पळावे ह्मणून त्याणीं धोंडे वगैरे मारिले; परंतु त्याणें पाकिटांतून ७१८ रु० काढून चुनीलालावर उलट मारून देऊन घड्याळासह कोठें पळ काढला माकडाचा खेळ झाला; पण चुनीलाल ६॥ शें रु०चे खामीस आले!!

पद्रीची मुलगी पळविली अल्लाबाद येथील अमरिकन मिशनरी रे व्ह० केलॅव यांचीं उपवर मुलगी तेथील सेंट्रल प्रेसांतील दोन युरोपियनांनीं पळविली; त्या बद्दल मिशनरीनें त्यांजवर फिर्याद केली आहे. स० शो०

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कविटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

## सचित्रकॅटलाग.



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

वामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दूषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखावला लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्य एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकेंद्र (मेंदु) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यानें पूर्ववत होतें. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ ८० १ डांक हाशील ०१३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६.
दुसरे खेपेस ..........०।

SUBSCRIPTION
Rs.
Per annum nt advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10 ..4 as
Repetition per ine3a

VOL XXV AKOLA MONDAY 25 MAY 1891 NO 20
वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २५ माहे मे सन १८९१ इ० अंक २०

नोटीस

रा. रा. जयसिंगदास हंसराज मारवाडी दुकान खामगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतेंकीं तुमची नोटीस ता. ९,५,९१ इसवीची अंक ४५चे वैदर्भपत्रांत आली ती आह्मी वांचून पाहिली त्याचें उत्तर खालीं लिहिलें प्रमाणें—

रुईचे ओझें संवत १९४७ फाल्गून शुद्ध पौर्णिमेचें करारांचे करार संपून आज सुमारें दोन महिने होत आले आहेत तरी निकाल करून पैसा देत नाहीं ह्मणून वगैरे मजकूरची नोटीस अल्पावरून या नोटीसीनें कळविण्यांत येतेंकीं रुईचे ओझें अह्मी तुमचें जवळून घेतलें असून त्या बद्दलचे रुपये बयान्याचे देऊन तुमचे हातचे हे सट्टे असोन आपणच आह्मांला उलट रुपये मागतां ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे रुईचे सट्टे आमचे जवळ आहेत त्याचे रुपये व्याजासुद्धां तुह्मी देऊन सट्टे परत घेऊन जावें. सर्व बाकीचे संबंधानें जो कांहीं आपण मजकूर लिहिला आहे त्या बद्दल आपण पुर्ण माहितगार व नामांकित सराफ असून सट्याचा व्यापार कसा असतो व त्याची कशी व्यवस्था करावी लागते हें सर्व जाणणारेच आहां असें असून विनाकारण नोटीसा देऊन दुसऱ्यास त्रास देणें हे आपल्या सारख्यास उचित नाहीं कळावें ता. २०,५ ९१ इसवी (सही)

श्रीराम शाळीग्राम शेट साहू दुकान खामगांव तर्फे कुलमुखत्यार सखाराम लहानोजी तायडे दस्तुर खुद.

नोटीस

रा. रा. कस्तूरचंद भिकमचंद मारवाडी दुकान खामगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतेकीं ता. ९.५,९१ इसवीचे अंक ४५ चे वैदर्भ पत्रांत तुमचे कडू नोटीस आली ती पावली त्याचें उत्तर येणें प्रमाणें —

संवत १९४७ फाल्गुन शुद्ध पौर्णिमेचे करारांचें रुईचे सट्याचा व्यापार होऊन आज सुमारें दोन महिने होत आले आहेत तरी अद्यापी तुह्मी पैसा देऊन निकाल करीत नाहीं ह्मणून वगैरेची नोटीस आल्यावरून तुह्मांस कळविण्यांत येतेंकीं रुईचे ओझें आह्मी तुमचे जवळून घेतलें असून तुमचे सट्टे आमचे पाशी आहेत आणखी तुह्मी आह्मांला लिहितां कीं रुपये देत नाहीं व सरा फिरीत अशी नसून हें लिहिणें केवळ वहिवाटलेल्या व इजतदार दुकानदाराची नाहीं अगदीं ज्याला कांहीं समजत नाहीं अगर दुसऱ्याला बुडविण्याची इच्छा आहे असें दिसतें करितां या नोटीशीनें कळविण्यांत येतेंकीं नोटीशीनें पावल्या पासून ६ तासाचे आंत आमची व्याजासुद्धां रक्कम आह्मास देऊन तुमचे सट्टे परत घेऊन जावे या प्रमाणें तुह्मी न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल एकंदर सट्याचे व्यापारांत बयान्याची रक्कम आमचीच तुह्मां कडून येणें असून तुह्मी नोटीशींत लिहितां कीं बयान्याची रक्कम पचविण्याची मनांत आहे तेव्हां ही सर्व लबाडी आहे. याच बद्दल सर्व माहिती आपणांस माहित असोन जाणून बुजून विनाकारण नोटिशीने त्रास देतां हें कांहीं बरोबर नाहीं कळावें ता. २०,५,९१ इसवी.

सही

संभूराम गोटीराम मारवाडी दुकान खामगांव दस्तूर खुद.

नोटीस

रा. रा. गणेदास भट्टर दुकान खामगांव यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची नोटीस तारीख ९ माहे मे सन १८९१ इसवीचे वैदर्भ पत्रांत अंक ४५चे आली ती पावली त्याचें उत्तर:—

तुमची नोटीस वांचून पाहिली असता त्यांत काहींच अर्थ दिसत नाहीं आणि सट्याचा व्यापार कसा आहे हें तुह्मास पूर्ण माहित आहे दुसरें तुम्ही लिहितां कीं बयाणा घेऊन पचविण्याचे आहे म्हणून लिहितां हे तरी तुमची फार चुकी आहे कारण कीं तुमच्या व आमच्या सट्याच्या रोजगारांत बयाणा देणें व घेणें मुळीच नसून तुम्ही पचविण्याचे लिहितां ही तुमची फारच चुकी आहे कळावें तारीख २०–५–९१ इसवी.

( सही ) मुलचंद ज्युगल किशोर दुकान खामगांव दस्तुर खुद.

नोटीस

रा. रा. जयसिंगदास हंसराज मारवाडी दुकान खामगांव. यांस

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची नोटीस तारीख ९–५–९१ चे इसवीचा अंक ४५ चे वैदर्भांत आली ती आम्ही वाचून पाहिली त्याचें उत्तर खाली लिहिल्या प्रमाणें

रुइचे ओझें संवत १९४७ फाल्गुन शुद्ध १५ चे करार चे करार संपून आज सुमारें दोन महिने होत आले आहेत तरी निकाल करून पैसा देत नाहीं ह्मणून वगैरे मजकूरची नोटीस आल्या वरून या नोटीशीने कळविण्यांत येते कीं रुइचे ओझें आह्मी तुमच्या जवळून घेतले असोन त्या बद्दलचे रुपये बयान्याचे देऊन तुमचे हातचे सट्टे असोन आपणच आह्मांला उलट रुपये मागता ही मोठी अचंब्याची गोष्ट आहे रुइचे सट्टे आमचे जवळ आहेत त्याचे रुपये व्याजासुद्धां देऊन सट्टे परत घेऊन जावें व बाकीचे संबंधानें जो कांहीं आपण मजकूर लिहिला आहे त्या बद्दल आपण पूर्ण माहितगार व नामांकित सराफ असोन सट्याचा व्यापार कसा असतो व त्याची कशी व्यवस्था करावी लागते सर्व जाणतच आहां असें असोन विनाकारण नोटीसा देऊन त्रास देणें हें आपले सारख्यास उचित नाहीं कळावें तारीख २०।५।९१ इ.

(सही) मूलचंद ज्युगल किशोर दस्तूर खुद

नोटीस

रा. रा. कस्तुरचंद भिकमचंद मारवाडी दुकान खामगांव यांस— खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतेंकीं तुमची नोटीस तारीख ९।५।९१ इसवीचा अंक ४५ चे वैदर्भांत आली ती पावली त्याचें उत्तर खालीं लिहिलें आहे.

तुमची नोटीस आह्मी वाचून पाहिली असतां त्यांत काहीं अर्थ दिसत नाहीं. सट्याचा व्यापार कसा असतो हें तुह्मांस पूर्ण माहीत आहे. तुह्मी नोटीसा देऊन विनाकारण आह्मास त्रास देतां हें कांहीं चांगलें नाहीं कळावें तारीख २०।५।९१ इसवी.

( सही )

तुळशीदास सुकदेवदास दुकान खामगांव दस्तुर द्वारकादास

नोटीस

रा रा. कस्तुरचंद मारवाडी दुकान खामगांव यांस — खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतेंकीं तुमची नोटीस तारीख ९।५।९१ इसवीची अंक ४५चे वैदर्भांत आली ती पावली त्याचें उत्तर खालीं लिहिलें आहे :–

तुमची नोटीस आह्मी वाचून पाहिलें असतां त्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. सट्याचा व्यापार कसा असतो हें तुह्मांस पूर्ण माहीत आहे. तुह्मी नोटीस देऊन विनाकारण आह्मांस त्रास देतां हें कांहीं चांगलें नाहीं कळावें तारीख १०–५–९१ इसवी.

( सही )

सरदारमल तेनमल

दुकान खामगांव

नोटीस.

रा. रा कस्तुरचंद भिकमचंद मारवाडी दुकान खामगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तारीख ९।५ ९१ इसवीचा अंक ४५ चे वैदर्भांत तुमचे कडून नोटीस आली ती पावली त्याचें उत्तर येणें प्रमाणें:– संवत १९४७ फाल्गुन शुद्ध १५ चे करारांचे रुईचे सट्याचा व्यापार होऊन आज सुमारें दोन महिने होत आले आहेत तरी अद्यापि तुम्ही पैसा घेऊन निकाल करीत नाहीं म्हणून वगैरेची नोटीस आल्या वरून तुम्हास कळविण्यांत येते कीं रुईचे ओझें आम्ही तुमच्या जवळून घेतले असोन तुमचे सट्टे आमचे पाशीं आहेत, आणखी तुम्ही आम्हाला लिहितां कीं रुपये देत नाहीं. सराफी रीत अशी नसोन हे लिहिणें केवळ वहिवाटलेल्या व इजतदार दुकानदारांचें नाहीं. अगदीं ज्याला कांहीं समजत नाहीं अगर दुसऱ्याला बुडविण्याची इच्छा आहे असें दिसतें. करितां या नोटीशीने कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्या पासून सहा तासांचे आंत आमची व्याजासुद्धा रक्कम आम्हांस देऊन तुमचे सट्टे परत घेऊन जावें. न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल.

एकंदर सट्याचे व्यापारांत बयान्याची रक्कम आमची तुम्हांकडे येणें असोन तुम्हीच नोटीशींत लिहितां कीं बयान्याची रक्कम पचविण्याचें मनांत आहे तेव्हां ही लबाडी आहे. यात बद्दल सर्व हकीकत तुम्हांला माहीत असोन जाणून बुजून विनाकारण त्रास देत आहां हें कांहीं बरोबर नाहीं कळावें तारीख २०।५।९१ इ.

( सही )

रीखबदास सवाईराम साहू दुकान खामगांव दस्तुर खुद.

नोटीस.

रा० रा० गणेशदास भट्टर मारवाडी दुकान खामगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस तारीख ९, ५, ९१ इसवीचा अंक ४५ चे वैदर्भ पत्रांत दिली ती पावली त्याचें उत्तर तुमची नोटीस वांचून पाहिली असतां त्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं सट्याचा व्यापार कसा असतो हें तुम्हांस पूर्ण माहितच आहे तुम्ही नोटिस विनाकारण आम्हांस देऊन त्रास देतां हें कांहीं चांगलें नाहीं कळावें तारीख २०, ५, ९१, इ०

( सही- )

श्रीराम शाळीग्राम शेटसाहू दुकान खामगांव तर्फे कुलमुखत्यार सखाराम लहानाजी तायडे दस्तूर खुद.

नोटीस.

रा. रा. गणेशदास भट्टर मारवाडी दुकान खामगांव— खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस ता० ९-५-९१ इसवीचा अंक ४५ ची वैदर्भांत आली ती पावली, त्याचें उत्तर:—

तुमची नोटीस वांचून पाहिली असतां त्यांत कांहींच अर्थ दिसत नाहीं व सट्याचा व्यापार कसा असतो हें तुह्मांस पूर्ण माहीत आहे. तुम्ही नोटीस देऊन विनाकारण आह्मांस त्रास देतां हें कांहीं चांगलें नाहीं. कळावें ता० २०-५-९१ इसवी.

( सही ) माहीदास ईश्वरदास दस्तुर सुलतानचंद पुरोहित.

नोटीस

रा. रा. गणेशदास भट्टर मारवाडी दु० खामगांव यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस तारीख ९।५।९१ इसवीचा अंक ४५ चे वैदर्भ पत्रांत आली ती पावली त्याचें उत्तर :—

तुमची नोटीस वांचून पाहिली असतां त्यांत कांहींच अर्थ दिसत नाही व सट्याचा व्यापार कसा असतो हें तुह्मांस पूर्ण माहीतच आहे. तुह्मी नोटीस देऊन विनाकारण आह्मांस त्रास देतां हें कांहीं चांगलें नाहीं. कळावें तारीख २०।५।९१ इसवी.

(सही)

तुळसीदास सुकदेवदास दुकान खामगांव दस्तुर द्वारकादास.

## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.


### नोटीस

भोनी मर्द भगू चांभारीण राहाणार पंचगव्हाण इस खालीं सही करणार इजकडून नोटिशीनें असें कळविलें जातें कीं आजपावेतों तुजला आह्मी कुलमुखत्यार नेमिलें होतें परंतु आजपासून तुझें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे हें तुजला कळावें.

आज पावेतों कुलमुखत्यारपणाचें काम जें तूं केलेस त्याजबद्दल नोटीस पावले पासून आठ दिवसाचें आंत सर्व आमचा हिशोब व कारभार आह्मांस समजून द्यावा असें नाहीं केले तर रीती प्रमाणें कोर्टात काम चालवून अखेर निकाल होई तोपर्यंत जे नुकसान होईल तें व ह्या नोटिशीचा खर्च असें सर्व भरुन घेतले जाईल ह्मणून नोटीस दिली.

तारीख २३।५।९१

( सही )

सहीची निशाणी बांगडीपुंजो मर्द बोंदऱ्या राणार पंचगव्हाण तालुके आकोट इच्याहातची असे.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं. आज पावेतों माझी मुलगी नांवें भोनी मर्द भगू इजला कुलमुखत्यार नेमिलें होतें परंतु कामामध्यें कांहीं अफरातफर दिसून आल्यामुळें आह्मी सदरहू भोनी मर्द भगू हिचे कुलमुखत्यार पत्र आजपासून रद्द केलें आहे.

कोणी आमच्या संबंधाची देवघेव सदरहू भोनी मर्द भगू इजबरोबर करूं नये केल्यास आह्मास मंजुर नाहीं. ह्मणून दिल्ही जाहिरात सही ता० २३।५ ९१

सही

सहीची निशाणी बांगडी पुंजी मर्द बोंदऱ्या राहणार पंचगव्हाण ता० आकोट इच्या हातची असे.

## वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य २ शके १८१३

नवरा बायकोच्या परस्पर हक्का संबंधानें विलायतेंत एका अपिलाच्या खटल्यांत एक महत्वाचा ठराव झाला आहे आणि तो ठराव झाल्या कारणानें विवाहित स्त्रीपुरुषा मधील बंधनें अगदीं शिथील होऊन समाजावर अरिष्ट ओढवेल अशीही कित्येक चतुर गृहस्थांची समज आहे. आणि थोडा बहुत प्रकार त्याप्रमाणें सध्यांच लोकांच्या अनुभवास येत चालला आहे ह्मणून त्याविषयीं फार गवगवा झाला आहे. 'ज्याक्सन' उपनांवाच्या नवराबायकोनीं अपिल कोर्टातांत एक खटला आणिला त्यांत वाद असा निघाला होता कीं नवऱ्याच्या अटकावास न जुमानतां स्त्रीस पाहिजे त्यावेळीं घराबाहेर जाण्यास हरकत आहे कीं काय. जन्मतः स्त्रीपुरुष ही उभयतां सारखीं हक्कदार आहेत तेव्हां त्यापैकीं एकाचें स्वातंत्र्य नष्ट करून त्यांस दुसऱ्याचे गुलाम करणें कायदेशीर नाहीं बायकोला आवडेल तेव्हां तिला नवऱ्यास सोडून जाण्यास कांहींएक प्रत्यवाय असूं नये इतकेंच नव्हे तर ती पुन्हा परत येईल तेव्हां घरधनीण असल्या कारणानें मालकीचे सर्व अधिकार तिला पतिसमवेत सर्वोपरीनें पोंचतात. या ठरावामुळें स्त्रीनें दिल चाहील त्याप्रमाणें नवऱ्यांस सोडून भटकावें तरी सुद्धां नवऱ्यास काडी मोडून टाकण्याचा हक्क नाहीं असें निष्पन्न होतें; आणि या प्रकारें नवरा ह्मणजे अगदीं बायकोचा बंदा मनुष्य बनतो कांकीं त्यास तिच्या स्वैर वर्तनाबद्दल पारपत्य करण्याचें कांहींच स्वातंत्र्य उरलें नाहीं. तिनें पाहिजे तिकडे मौजा माराव्या तरी तिच्या पोषणाचा खर्च लग्नसंबंध कायदेशीररीत्या तुटेपर्यंत नवऱ्याला सोसला पाहिजे कांकीं तिनें दुसरा घरठाव केला तरी व्यभिचारादी दोष तिच्या अंगीं लागूं होईपर्यंत त्याला काडी मोडतां येत नाहीं. ही बिकट अडचण दूर व्हावी ह्मणून हंटर साहेबांनीं हाऊस आफ कामन्समध्यें नवीन बिल आणलें आहे तें असें कीं योग्य कारणावांचून स्त्री नवऱ्यापासून चार वर्षेपर्यंत वेगळी राहील तर तिच्याशीं घडलेला लग्नसंबंध त्याला तोडतां यावा. अशाच प्रकारचा बायकोस ही हक्क मिळाला जाईल ह्मणजे नवरा अन्यस्त्रीगामी आहे असें सिद्ध करून सध्यां नुसतें निराळें राहण्यास कायद्यानें परवानगी मिळते त्या ऐवजीं या बिलानें कायमचा लग्नसंबंध तोडण्यास संधि सांपडेल. अद्याप पर्यंत लग्नसंबंध तोडण्यास नवऱ्यानें तिचा त्याग केला आहे, किंवा तो तिला निर्दयपणानें वागवितो वगैरे गोष्टी सिद्ध कराव्या लागत असत त्या यापासून इतःपर लागणार नाहींत.

एकंदरीनें इंग्रज लोकांचा समाज नवरा बायकोच्या संबंधांत वरील थराला येऊन पोंचला आहे. सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या सामाजिक स्थितीचें हें दर्शक आहे असें ह्मणणें निदान आमच्या मताशीं जुळत नाहीं. या स्थितीला काय संज्ञा द्यावी हें जरी आह्मी खात्रीनें सांगू इच्छित नाहीं तरी आमच्या समाजास अशा प्रकारच्या कायद्याची आवश्यकता लागणार नाहीं असें निदान आह्मी आमच्या पिढ्या पुरतें सांगू शकतों. ज्याकसन खटल्यांत लार्ड चान्सलर साहेबांनीं निकाल नमूद केला आहे त्यांत आनंद मानण्या सारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे स्त्रीस्वातंत्र्याचा सर्व जगभर डंका वाजेल. हा काळ पावेतों स्त्रियांच्या हक्काचा विजय इतका पूर्णपणें झाला नव्हता, आणि या पुढें स्त्री पुरुषाहून काडीमात्र कमी नाहीं ती पुरुषाच्या बरोबरीची असून स्वतांची मुखत्यार व पूर्णपणें स्वतंत्र मानली जाईल, हा मुद्दा तर नामी खरा. परंतु लग्न ह्मणजे करारनामा आहे आणि त्या कराराची योग्यता मनुष्यांच्या इतर व्यवहारा प्रमाणें समजली ह्मणजे स्त्रीपुरुष नीतीमान राहून संसारयात्रा सुखपरिणामी होईल किंवा मनुष्याचे नीतिविषयक विचारांत फार अंतर पडेल याचें अनुमान वाचकांनीं परभारे बांधावें असें आह्मी सुचवितों.

स्वातंत्र्याच्या माहेरघरीं राहण्याची आवड लागली ह्मणजे नवराबायकोंचा संबंध शिथील होत जाऊन अनादिकाला पासून चालत आलेल्या धर्मविचारांस व नितीस हरताळ लागेल किंबहूना नवराबायकोंचा परस्पर संबंध पशुतुल्य स्वेच्छाचारी होऊन अशाश्वत होईल आणि तेणेंकरुन सामाजिक व्यवस्थेंत एका लग्नसंबंधानें घडणारे चिरस्थायी व दृढतर स्नेहसंबंध व आप्तभाव हळूहळू लयास जाऊन सामाजिक गोष्टींत सर्व प्रकारें अनर्थ उद्भवण्याचा संभव आहे. आतां या वरुन असा निर्णय लोकांनीं करुं नये कीं वरील ठराव झाल्यामुळें लागलीच कांहीं युरोपियन लोकांत विलक्षण स्थित्यंतर होईल. असा बिलकूल प्रकार नाहीं तरी वरील 'ज्याक्सन' ठरावानें स्त्रियांस भलभलत्या मार्गानें जाण्यास प्रतिबंध फार कमी होतात आणि उत्तरोत्तर लोकलज्जा कमी वाटून नीतीला सोडण्याचें मानसिक भय नाहींसें होत जाऊन कायदेशीर वर्तन ठेवण्याची साधारणपणें मनाची प्रवृत्ती अधिकाधिक होईल. नवरा आपणास आवडेनासा झाला किंवा परपुरुषाशीं आपलें मन जुळलें तर स्त्रिया नवऱ्यास सोडण्यास माघार घेणार नाहींत किंबहुना त्या सोडून जातील असा भितीनें किंवा प्रसंगोपात त्यांच्या धमकावणीनें नवऱ्याची स्थिति ही मोठी कष्टमय होईल आणि त्यांचें वर्तन सदोदित संशयाचें व बेभरंवशाचें राहील.

नवराबायकोच्या संबंधाला अनुसरून वर विलायतच्या लोकांचे अभिप्राय दर्शविले आहेत त्याचा मुद्दा हा कीं आह्मास सुधारणेच्या संबंधानें कांहीं गोष्टी लोकांच्या नजरे समोर आणावयाच्या आहेत. सुधारणेचा ओघ आजकाल असा वाहतो कीं त्या पासून लोक कायदेशीर रीतीनें वागण्यास फार शिकतात आणि तसें वागतात मग पापापुण्याचे विचार त्यांचे क्रमाक्रमानें मागें पडून नीतिविषयक प्रकरणांत ही त्यांच्या विवेकाचा ऱ्हास होऊन लोक धर्मभ्रष्ट व नीतिभ्रष्ट बनत आहेत याचा अनुभव कायदेपंण्डितांस व त्यांच्या पक्षकार लोकांस पदोपदी येत असतो आमच्या मतें कायदेशीर वर्तन ह्मणजे सर्वथैव न्यायास व नीति मत्तेस सोडून असतें असा प्रकार नाहीं तरी कायद्याची व्यापकता नीतितत्वाच्या व्यापकतेच्या मानानें फार अल्प आहे. मनुष्याचे व्यवहार चांगले पायाशुद्ध व नीतीस अनुसरून चालण्यास कायदा पुरेसा नाहीं. लोकांच्या मनांत विवेक जागृत पाहिजे. त्यांचीं धर्मबंधनें फार बळकट असावीं लागतात. ह्मणूनच विवाहित स्त्रीपुरुषा मधील परस्परांचे हक्क व अधिकार काय काय आहेत या विषयीं परिस्फूटता धर्मशास्त्रावरुन व पुराणादि ग्रंथांतील वेचक गोष्टीवरुन साधारणपणें करुन सर्व राष्ट्रांतील लोक आपआपल्या समजुती प्रमाणें आपणास सामाजिक बंधनें घालून घेऊन नवराबायकोच्या संबंधाचे फक्त अत्यावश्यक नियम सरकारी कायदेकानूच्या मार्गानें करतात असतात. ही कायद्याची सल्ला व कुमक समाजास देण्याची रीत प्रायः एका धोरणावरुन चालू असते तरी देशोदेशीच्या रीतीरिवाजा प्रमाणें नवराबायकोच्या हक्काच्या मर्यादा कमजास्त प्रमाणानें नेमस्त असतात त्या प्रमाणें त्या देशाच्या तद्विषयक कायद्यांत फरक दृष्टीस पडतो. हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमाना संबंधानें कायदे धर्मशास्त्राला अनुसरुन रचले आहेत तरी त्यांत इंग्रजी कायद्यांच्या तत्वांची भेसळ करण्याचा प्रयत्न उत्तरोत्तर फैलावत आहे तव्हां लोकांनीं तसें न होऊंदेण्या विषयीं खबरदारी घेऊन आपली धर्मबंधनें दृढतर करण्यास झटलें पाहिजे.

---

राष्ट्रीय सभेच्या येत्या बैठकीच्या समारंभाच्या जयाचा ज्या मध्य प्रांतस्थ लोकांनीं विडा उचलला आहे, व ज्यानीं गोरक्षणा निमित्त मोठा कार्यभाग स्वतांच्या माथीं घेतला आहे, त्या लोकांच्या अंगीं देशाभिमानांचें वारें खेळत असल्या कारणानें ते देशाच्या कल्याणाच्या अन्य गोष्टी करण्यास अगोदर तयार राहातील अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे. मध्य प्रांतांत कापडाच्या व सुताच्या गिरण्या आहेत व तिकडेच मागावर लुगडीं, धोतरजोडे, पाहिल्या प्रतीचे काढणारे कुशल कोष्टी लोक आहेत तेव्हां देशी कपडालत्ता वापरण्या विषयीं त्या प्रांतांतील लोकांस जागृत करुन त्यांच्या ही ठिकाठिकाणीं मंडळ्या स्थापीत झाल्या पाहिजेत व त्या कामीं कोणी ही मागें पाय न घेतां तशी मंडळी निघाल्याचें आह्मांस थोडक्यात ऐकूं येईल अशी आह्मांस उमेद आहे. आह्मी स्वदेशी माल वापरण्याविषयीचें आपले विचार प्रदर्शित केल्या नंतर गेल्या अंकी देशी व्यापाऱ्यांच्या सभा स्थापित झाल्या पाहिजेत अशा विषयीं व्यापाऱ्या मधील प्रमुख गृहस्थांस विनंती केली आहे ह्या दोन्ही गोष्टी आमच्या प्रांतांत प्ररूढ होण्यासाठी आह्मी प्रथम झटत आहों तरी आह्मास आमचे मध्यप्रांतस्थ लोक मागें सारतील व ते आह्मांस असल्या गोष्टी कशा कराव्यात हें शिकवतील असें हा एके प्रकारें त्यांच्या नेहमीच्या बाण्या वरुन वाटतें. तेव्हां तिकडील पत्रकार आमच्या ह्मणण्याचें योग्य मनन करुन त्या संबंधानें सर्व प्रांतभर चळवळ करितील तर फार उत्तम होईल. नागपूर समाचार, न्यायसुधा, आदिकरुन वर्तमानपत्रांतून वेळोवेळ अशा प्रकारचे अनेक लेख आले आहेत तरी त्या पत्रांचे कर्ते या पुढें कांहीं काळापर्यंत याच विषया संबंधानें विशेष वाटाघाट चालूं ठेवितील. अशी आह्मी आशा बाळगितों.

---

इंग्रजी राज्याचा कचाटा फार बिकट आहे. जें जें ह्मणून होईल तें तें निमूटपणें ऐकून घेऊन स्वस्थ बसलें पाहिजे. काशींतील राममंदिरा निमित्त धर्मभोळ्या लोकांनीं आपल्या जीवाकडे पाहिलें नाहीं व तें देऊळ जमीनदोस्त होत आहे असें कळतांच जे शीरकमळ हातावर घेऊन देवालयाच्या संरक्षणार्थ धावले त्या लोकांस त्राता कोणी उरला नाहीं व त्याच्या पक्षांनें भांडण्यास कोणी ही तयार नाहीं असें वर्तें. पाण्या

च्या नळाच्या सोयीसाठीं मुनसिपालिटी राममंदिर पाडण्याच्या विचारांत होती तेव्हां तें वर्तमान जाहीर होतांच लोकांनीं सरकार नजवळ ओरड केली आणि राजे दिनकरराव व पुष्कळ थोरथोर गृहस्थ यांनीं देऊळाची पाडापाड न करण्या विषयीं सरकारास विज्ञप्ती केली तरी देखील मुनसिपालिटीचे कमिशनराकडून लोकांस मंदिराच्या शाश्वत विषयीं आश्वासन मिळालें नाहीं किंवा खुद्द सरकार मार्फत कांहीं व्यवस्था लागली नाहीं. अशा निराशेच्या प्रसंगीं मुनसिपालिटीच्या संशयात्मक वर्तना वरून लोकांस दहशत पडली व एका एकीं प्राणाहून ही श्रेयस्कर अशा धर्मावर गदा पडत आहे व राममंदिरांतील देवस्थान भ्रष्ट होत आहे असा लोकांचा समज पक्का होतांच लोक चिथरले किंबहुना रागाच्या व संतापाच्या त्वेषांत वेडे झाले व त्यांच्या हातून दोषात्मक गोष्टी घडून आल्या, मंदिराच्या द्वेष्ट्या सभासदांवर राजरोस हल्ला झाला व जिकडे तिकडे दंग्याचा कल्लोळ माजला यांत नवल तें काय? प्राणाहून कांहीं प्यारा नाहीं परंतु जेव्हां त्याची ही बेपरवा होते तेव्हां सर्व गोष्टी छटपटतात मग त्या पुढें कसला ही मनुष्य असला तरी विचारशून्य होतो यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

वरील गोष्ट हिंदु देवळाच्या संबंधानें घडली इकडे इनसाफ चालला असून अपराधी काळे पाण्याच्या, बाराबारा चौदाचौदा वर्षांच्या शिक्षा भोगं लागत आहेत नाहींततोंच गेल्या आठवड्यांत कलकत्यास मुसलमान लोकांची मशीद पाडण्या विषयीं सरकार तर्फे हुकूम त्या मशिदीची जागा विकत घेतलेल्या बाबू गृहस्थांस मिळाल्याची माहिती कळताच मुसलमान लोक चिथरून मोठा दंगा झाला त्या दंग्यांत कांहीं हिंदुलोकही दृष्टीस पडले. पोलिसलष्करशीं सामना होऊन मारहाण फार जंगी झाली. युरोपियन कांहीं अधिकारीही जखमी झाले. पुष्कळ दंगेखोर मारामारीनें व्याकूळ होऊन मृत्यूच्या द्वारीं बसले आहेत. दंगेखोरा पैकीं पुष्कळ जणांस पकडलें आहे आणि कित्येकांची बेधडक दंग्या निमित्तानें पळधर चालली आहे तेव्हां न्याय कोडतांत चौकशी होऊन अपराध्यांस जबर शिक्षा भोगाव्या लागतील ही गोष्ट आतां कायम ठरली आहे. आह्मी काशीच्या व कलकत्याच्या हिंदु मुसलमानांनीं दंगा केला हें शहाणपणाचें काम केलें असें समजत नाहीं तरी आमच्या मतें त्यांस आपल्या देवळाच्या संरक्षणाचा दंग्या व्यतिरिक्त दुसरा मार्गच राहिला नव्हता अक्कलेच्या गोष्टींची अखेर मजल पोंहोचली आणि मनुष्य निरुपाय झाला ह्मणजे तो सैरावैरा बनून इष्ट हेतूच्या प्राप्ती साठीं हवे तसें वागूं लागतो आणि तशांत आपल्या धर्म प्रकरणच्या बाबतींत आपण खऱ्या पक्षानें भांडत आहों अशी त्यांची पक्की खातरी असली ह्मणजे त्यास बेफामपणानें वागण्यास दिक्कत वाटत नाहीं. तेव्हां मनुष्यास त्याच्या उपजत स्वभावा विरुद्ध वागण्यास कायद्यानें भाग करणें ही सरकारची मोठी चूक होय. आणि संमती बिलानें लोकांस असंतुष्ट करून टाकलें आहे इतक्यांतच त्यांच्या पुढें त्यांच्या धर्म विचारास प्रतिकूल अशा गोष्टी करून त्यांस चिडविण्याचा बोजा सरकारानें उचलूं नये.

## The Berar Samachar

### MONDAY, MAY 25, 1891.

The resolution of the Government of India, reviewing the statistics of Education for the past year, was issued in February last. But as is the fate of such documents, it was rather pigeon-holed than brought to light to be publicly read, thoroughly and carefully revised and minutely commented upon. Documents which are in their nature of great importance as affecting the highest of public interests, avoid general notice by being stowed and piled up in heaps, on shelves to encumber the ground for years after years. But when through a lucky chance, they are brought to light they never fail to tell their doleful tale. Every one really interested in the matter hastens in eagerness to read them and dilate upon them. Naturally, then, the last Government Resolution was most extensively read by many educated natives. But, we are sorry to say, it aroused in them deep and profound regret and a kind of honest indignation to learn that a brutal and merciless perversion of the truth should prevail in matters regarding the highest of public interests. Fantastical illusions are reigning in all quarters owing to the want of true and authentic information on the point. It is often asumed, stated and declared that the Indian Goverment showed utter prodigality by a profuse and lavish expenditure on the score of Indian Education. Whether this general assumption was the outcome of ignorance or of some malicious ill motive working in the dark, is another question which scarcely concerns us at present. What concerns us most here and now is that India is losing much by being represented in false lights to those on whom rests the duty as well as the responsibility of advancing Indian progress and civilization. In the first place the real wants of the natives are not clearly discerned and correctly estimated. Thus the mistake lies as Bacon would like to put it, in the digestion. Even when they are, some how, picked up hap hazard and estimated to a sufficiently accurate measurement, they are never represented as they are. Owing to diversity of circumstances— such as want of intimate acquaintance with the modes of life and manners of the natives, hazy and vague ideas gathered from unreliable sources and through foreign & consequently the least trustworthy mediums, a subsequent misapprehension of the native of India as he is, and so forth the real wants can never be truly ascertained unless special attention is called to them. We may hope that such attention may one day be called and that Government may find out means to remove the grievances. To clear up, then, the mistaken idea rampant in most of the leading minds we may conveniently as well as advantageously put down here the official figures. The official document records in round numbers £ 2,800,000 as the net total income expended on Education. The total is made up by several contributions of which the following is the order:—

| | £ |
|---|---|
| Provincial Revenues | 760000 |
| Local Funds | 490000 |
| Municipal Funds | 130000 |
| Fees | 800000 |
| Net balance expended by the Supreme Govt. | 620000 |

At a glance it is apparent, that the amount contributed as fees by the poor, and impoverished scholars by far exceeds the Imperial munificence dan more than closes upon full one fourth of the total net outlay on Education. As quite natural and perfectly consistent every generous minded man would allow that a contribution should stand direct proportion to the ability to give. The scale of ability rising steadily from the poor scholars to Provincial Governments must as of course culminate in the Supreme Imperial Government. Surely then the contributions ought to rise according to the same scale. But we are disheartened to see that in the case of contribution the scale is overturned and most unjustly. It is quite breaking in upon the nature of things that the richest should pay the least & the poorest the most. It may be quite cogently argued that the Supreme Government has to look to many other important things; but a Government which professes to be the leader of all progress and civilization in the East should never take behind and hesitate to act up to its profession. If the Government of India really wants this high and rare honour it must needs prove itself worthy of it. It can do this only by bearing to a considerable extent the burden of Education. But the Supreme Government shakes it off and places it on the poor scholars and provincial Governments.

It is also within the mark-disparaging a little though it may be, to state that donation of the Supreme Government is even less than the cost of a single battleship when we read that the percentage of fee receipts to the actual cost of the University is about 1 at Oxford and something less than two in the Queen's Colleges in Ireland the fact that the poor native scholars are forced to contribute more than full one fourth of the total net expenditure is in itself a remarkable feature in Indian Education giving rise to serious and startling consideration. It is clearly, an unsafe policy to let go the hearty co-operation of the natives which would otherwise necessarily arise from a free and adequate provision for their Education. In England Universities and schools have, from old times, been enjoying endowments & the long roll of private founders and benefactors is one of England's titles to honour. It would not be out of place, here to remark, that the endowment of Education in England is many hundred fold more than in India. Yet the English State devotes more than double as much to supplement the vast endowments of education, as the Indian Government allots to a population near ly 10 times as numerous & almost destitute of corresponding endowments. If seven crores of Rupees is a very short and inadequate provision for education in England less than three crores is surely unable to meet the Educational needs of India. When things are thus clearly put and sharply contrasted they produce strong convictions. And when once convictions are formed, and the prefunctory character of Govt. of India in the branch of Education is once fully realized our duty is to press upon the Government of India, the claims of Education to a larger share of revenue with an irresistible force. Every native of India, therefore, if he really has the interests of his country at heart, should agree this matter, with as much force and vigour as possible, upon the immediate consideration of the Government of India.

The total Revenue in India exceeded the Budget Estimate by Rx. 1,977,160, and the total expenditure in India fell short of the Estimate by Rx. 833,691. Of this total improvement of Rx. 2,810,851, Rx. 1,189,796 occurred in the Provincial and Local section of the Accounts, the improvement in the Imperial section being Rx. 1,621,055. The Revenue in England also exceeded the Estimate by £121,658, and the Exchange on it by Rx. 51,075; while the Expenditure in England was less by £ 321,277, and the Exchange on it by Rx. 390,658. The total improvement in England and Exchange was thus Rx. 884, 678, which, with the improvement of Rx. 1,6210,55 which occurred in the Imperial section of the accounts in India, raisedthe surplus of Rx. 106,300 anticipated in the Budget Estimate to Rx. 2,612,033.

Mr. F. B. Dickinson, Deputy Conservator, 2nd Grade, Central Provinces, and officiating Conservator, 3rd Grade, Berar, to be Deputy Conservator, 1st Grade, and continue to officiate as Conservator of Forests in Berar. I. G.

## वऱ्हाड

रा. रा. देवराव विनायक हे कांहीं गृहस्था समवेत बुलढाणें जिल्ह्यांत गांवोगांव सभा भरवून 'राष्ट्रीय सभे'ची वर्गणी जमवीत आहेत या विषयीं आह्मी त्या मंडळीचे फार आभारी आहों.

मि. विटनेकर हे युरोपियन असल्या कारणानें त्यांची चौकशी मुंबई हायकोर्टांत चालवावी असें ठरलें आहे. साहेबांनीं आपल्या जावनजाबांत कांहीं बड्या साहेबांस नाजूक रितीनें गुंतविलें आहे. निष्पन्न काय होईल तें खरें!

मि. मॅकेंझी साहेब चिखलदऱ्याहून मुंबईस जाणार आहेत. मि. हेअर साहेबांस ही आजारामुळें मुंबईस जाणें भाग होत आहे. सेत्ल सेटलमेंट आफिसचे हेडक्लार्कचे जाग्यावर रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे यांस नेमिलें आहे इत्यादि बातम्या प्रमोदसिंधु कर्ते कळवितात.

मुंबईकर परांजपे संगीत नाटककार मंडळीनें शनिवारीं मृच्छकटिकाचा खेळ दुसऱ्यानें दाखविला. कांहीं गृहस्थांच्या आग्रहा वरून येत्या आठवड्यांत ही मंडळी 'रामराज्य वियोगाचा' त्रिवार प्रयोग करून अकोले करांस अखेरची सलामी देतील.

येथील नदींत एक लहान मुलगा या आठवड्यांत बुडून मेला.

अगर येथील एका कीतिका बाईनें जनापवादास भिऊन बालहत्या केल्याच्या खटल्यांत आमचे सिव्हील सर्जन रेली साहेब यांनीं आपल्या जबानींत एक सांगितलें व मागाहून पत्रानें तें खोटें ह्मणून कळविलें. या विसंगतते विषयीं त्यांचा जाब घेण्यास कोणा अधिकार नाहीं असें दिसतें.

येथील टॅपल बगीचाच्या व जूकडील आकोट सडकेस गांवाच्या हद्दींत ही कंदील नाहीं ही वाईट गोष्ट आहे कांकीं ती हमरस्ता असून त्या ठिकाणी मोठमोठे भुजंग दृष्टीस पडतात तेव्हां मुनसिपालटीनें इकडे लक्ष पुरवावें.

अकोला तहशिलींत अर्ज दाखल करण्यास प्रयास व विलंब लागतो अशी ओरड ऐकू येते त्याकडे आमच्या तहशिलदार साहेबांनीं लक्ष पुरवावें.

## वर्तमानसार.

अमेरिकेंतील एक पत्रकर्ता ह्मणतो कीं इंग्लंडांत मनुष्याच्या चामड्याला फार मागण्या आहेत. काय कारणानें कोण जाणे.

जमू एथें पांच हजार संस्कृत लेख सांपडले आहेत. वेदाच्या जुन्याप्रती ही यांत असून श्रौत स्मार्तांचा कांहीं भाग ही यांत आहे. या लेखावर विक्रम ११४८ हें वर्ष आहे.

पारदर्शकमूल— न्युयार्क एथें एकमूल जन्मास आलें आहे. तें इतकें नाजुक आहेकीं, एखाद्या भिंगा प्रमाणें त्यांतून त्याच्या शरीरांतील सर्व क्रिया चाललेल्या दिसतात धा. वा.

इंग्लंडांत लिंकोनशायरमध्यें एका पाद्री मडळीपासून एका गोऱ्या व्यापाऱ्यानें किती भारी व्याज घेतलें याबद्दलचें एक प्रकर्ण गेल्या विलायतच्या डांकेंतून आलेल्या पत्रांतून आलें आहे, ते वाचण्यासारखें आहे. या पाद्री साहेबांनीं या गोऱ्या दयाळू सावकारापासून प्रथम १० पौंड कर्ज काढलें व तें थोड्याच दिवसांत देऊन टाकलें नंतर पुन्हा २० पौंड कर्ज काढलें तें दरसाल दर शेंकडा ३ टक्के व्याजानें परत केलें. पुनः त्याच सावकारापासून त्यानें पुनः ६० पौंड कर्ज काढलें, त्याच्या व्याजाबद्दल ह्मणून सदर पाद्री साहेब त्या सावकारास दरसाल ४० पौंड प्रमाणें तीन वर्षे देत गेले नंतर पाद्री साहेब हिशेब पाहावयास गेले तेव्हां पोंचलेले १२० पौंड सदर सावकारानें व्याजांत घेतले आणि मुद्दल ६० पौंड पाद्री साहेबांच्या डोक्यावर तसेंच राहिलें. ६० पौंडांचे एका सालाचें ४० पौंड व्याज ह्मणजे दरमहा २ रुपयास ३॥ पेशाहून ही जास्त व्याज पडतें. यानंतर याच पाद्री साहेबांनीं पुन्हा २१ पौंड कर्ज काढिलें त्याचें व्याज दर शेंकडा १२० पौंड या भावानें या अघोरी सावकारानें घेतलें. हें व्याज एका रुपयास एक महिन्यास ६ पैशा प्रमाणें या सावकारानें घेतलें असें उघड दिसतें. पाद्री कुळाकडून रुपये न पोहोंचल्यामुळें पुढें हें प्रकर्ण दिवाणी कोर्टांत गेलें तेव्हां पाद्रीनें सावकाराच्या भारी व्याजाबद्दल तक्रार केल्यावरून या सावकारानें आजपर्यंत कसें कसें व्याज घेतलें याबद्दल सरकारामार्फत चौकशी सुरू आहे असें तिकडील पत्रावरून समजतें. यावरून एक तत्व निघतें, तें हें कीं गोरे असोत, काळे असोत हव्यासानें कोणासही सोडलें नाहीं.

उलटा एफेल मनोरा—पारिस येथील एफेल मनोरा ९६० फूट आहे तो खालीं रुंद व टोंकपास निमुळता होत गेला आहे. आतां १८९२ सालीं शिकागो येथें जी जगयात्रा भरणार आहे त्यावेळीं एफेल मनोऱ्याच्या व्युत्क्रम आकाराचा एक मनोरा तयार करण्यांत येणार आहे. ह्मणजे हा मनोरा खालीं निमुळता व शेवटाकडे रुंद असा करावयाचा आहे. हा मनोरा तळाशीं ५० फूट व्यासाचा व शेवटास २०० फूट व्यासाचा होईल. ह्मणजे हा मनोरा दांड्यावर उघडलेल्या छत्रीप्रमाणें दिसेल. वरील रुंद व भव्य इमारत खालअरुंद मनोऱ्यावर नेटदीनें व सारखी उभी रहावी व कलूं नये ह्मणून लोखंडी भक्कम दोर चार बाजूनीं लाऊन ताण देण्यांत येणार आहे.

—अमेरिकन व ब्रिलियन लढाऊ जहाजांची चकमक उडेल असें समजतें.

इनकुलुएंझाच्या साथीनें पार्लमेंटचे १७ सभासद आजारी आहेत.

—काफ वेटांत बुंगा चालला असून तेथील गव्हरनरास बरतर्फ केलें आहे.

बंगाल्यांत कांहीं ठिकाणीं पाऊस पडला. कांहीं प्रांतांत अति महर्गता झाली आहे. सु. प.

परिक्षक!—(वरच्या इयत्तेच्या वर्गांतल्या मुलास) कायरे, तुह्मांला कांहीं अलंकार माहीत आहेत काय? (हो। असें उत्तर मिळतांच) तर मग, व्याजोक्ति अलंकाराचें एक उदाहरण सांगा पाहूं.

एक मुलगा:— परिक्षक परिक्षा सोपी घेतात.

उन्हाळ्याकरितां उत्तम पेयः—५तोळे चिंच व १०तोळे मनुका, तीन शेर पाण्यांत एक तास पर्यंत उकळाव्या. नंतर तें गाळावें, नंतर गार करावें किंवा त्यांत बर्फ घालावें ह्मणजे फार उत्तम पेय तयार होतें. उन्हाळ्याचे दिवस आहेत, अनुभव घेऊन पाहवा. कर०

मुंबई सरकारानें नुकताच एक ठराव प्रसिद्ध झाला आहे. या ठरावांत असें ह्मटलें असें आहे कीं "या पुढें पोलीस खात्याचा जो खर्च वाढेल तो म्युनिसिपालटीनें दिला पाहिजेच पण आणखी दोन वर्षांनीं पोलीस खात्यास सरकाराकडून दर वर्षी जी ९० हजार रुपयांची मदत मिळते तीही मिळणार नाहीं ह्मणजे तो सर्व खर्च म्युनिसिपालटीनेंच सोसला पाहिजे."

पुण्याचे प्रसिद्ध वकील मि. गंगाराम भाऊ म्हसके यांच्या विरुद्ध एका बोहरी दुकानदारानें जुलुम करण्यासाठीं रात्रीं घर फोडलें असा आरोप आल्यावरून त्यास गेल्या १२ व्या तारखेस वारंटानें पकडण्यांत आलें आहे सदरहू वारंट लष्करच्या माजिस्त्रेटानें काढलें असून त्यानें मि. गंगाराम यांचा १० हजारांचा जात मुचलका व ८ हजारांचे दोन जामीन घेऊन त्यास खुलें केलें आहे. सुमारे १०० बोहरी लोकांनीं मि. गंगाराम यांच्यावर नुकताच हल्ला केला असून त्यावेळीं पोलिसांनीं त्यांचें रक्षण केलें नसतें तर त्यास बराच मार खावा लागता असें ह्मणतात. पुणें सिटी म्युनिसिपालटी संबंधानें सरकारानें जी एक सुचना पुढें आणली आहे त्या संबंधानें सरकारानें जी एक सुचना पुढें आणली आहे त्या संबंधानें माझ्यावर हा कट करुन खोटा आळ घेण्यांत आला आहे असें मि. गंगाराम यांचें ह्मणणें आहे.

मणीपूरच्या राजास, सेनापती आणि इतर अधिकारी लोकांस जो पकडून देईल त्यास हिंदुस्थानसरकाराकडून इनाम देण्यांत येईल असें पायोनियर पत्रांत प्रसिद्ध झालें आहे तें खरें आहे कीं काय? असा लार्ड सर्पेत मार्किस ऑफ रिपन यांनीं स्टेट सेक्रेटरीस प्रश्न केला त्यावर उत्तर देतांना स्टेट सेक्रेटरी लार्ड क्रास ह्मणाले कीं, अशा अर्थाचा जाहिरनामा हिंदुस्थानसरकारामार्फत मुळींच प्रसिद्ध झाला नाहीं असो मत्ता पूर्ण खात्री आहे.

जबरदस्त अत्तर—ग्रासी नांवाचें एक अत्तर आहेत, त्यास दरसाल अत्तरासाठीं १२०० तारेंगाचीं फुलें ८०० टन गुलाबाचीं २००टन जाईचीं १०० टन व्हायोलेटचीं, व २५० टन ट्युबरोझचीं फुलें लागतात. याचें राहण्याचें ठिकाण समुद्रापासून १०६२ फूट उंच आहे आणि २०० वर्षे सदर जागा त्याच्याकडे आहे.

मूर्खांना काय वाटतें—देशांतील एक तृतियांश मूर्खांस वर्कृत्वांत काय आहे! असें वाटत असतें; निम्यांस डाक्तरपणांत काय आहे असें वाटतें; दोन तृतियांशांस वाटतें कीं, धर्म शास्त्रांत काय आहे? आणि सगळ्यांनां अशी खातरी असते कीं,पत्र चालविणें म्हणजे कांहींच नाहीं! तें तर अपण सहज करूं!!! खरेंच.

चार हात आणि चार पायाचें मुल—नागपुरच्या एका गांवांत एका बाईस चार हातांचें आणि चार पायाचें एक मूल झालें आहे व तें जिवंत आहे. दी० बं०

नोटीस.

रा. रा. कस्तुरचंद भीकमचंद दुकान पेठ खामगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं ता. ९।५।९१ इसवीचे अंक ४५ चे वैदर्भ पत्रांत तुमचे कडून नोटीस आली ती पावली त्याचें उत्तर येणें प्रमाणें— संवत १९४७ मिति फाल्गुन शुद्ध पौर्णिमेचे कराराचें रुइचे सद्याचा व्यापार होऊन आज सुमारें दोन महिने होत आले आहेत तरी अद्यापी तुम्ही पैसा देऊन निकाल करीत नाहीं. म्हणुन व गेरेची नोटीस आल्या वरून तुम्हांस कळविण्यांत येते कीं रुइचे ओझें आम्ही तुमचे जवळून घेतलें असून त्याचे बद्दल बयान्याचे रुपये तुम्हास दिले असून तुर्वत सट्टे आमचे पाशीं आहेत आणखी तुम्ही आम्हाला लिहितां कीं रुपये देत नाहींत व सराफी रीत अशी नसून हें लिहिणें केवळ वहिवाटलेल्या व इनतदार दुकानदाराचें नाहीं. अगर्दी ज्याला कांहीं समजत नाहीं अगर दुसऱ्याला बुडविण्याची इच्छा आहे असें दिसतें करितां या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्या पासून ६ तासांचे आंत आमची व्याजासुद्धां रकम आम्हास देऊन तुमचे सट्टे परत घेऊन जावेत या प्रमाणें तुम्ही न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली- जाईल एकंदर सद्याचे व्यापारांत बयान्याची रकम आमचीच तुम्हां कडून येणें असून तुम्हीच नोटिशींत लिहितां कीं बयान्याची रकम पचविण्याची मनांत आहे तेव्हां ही सर्व लबाडी आहे या बद्दल सर्व हकीकत माहित असोन जाणून बुजून विनाकारण नोटिशीनें त्रास देतां हे कांहीं बरोबर नाहीं कळावें ता. २०।५।९१ इ०

(सही)

जगतमल जयनारायण दुकान खामगांव दस्तुर लखमी चंद.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कावेटकर

मर्चंट आणि कमिशनर एजंट

शहर एलिचपूर

वामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हात पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखा-कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांचे, मस्तकाचे व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्य पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास हा सारखे दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १३ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता नाऊर अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. यानें सर्व शरिरांतील चेतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदु) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्यांचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही गोळ्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद काळ्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील. आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.